cmyk

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
-संपादक

# दै. राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१११ | शुक्रवार, दि.१५ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### एखादे पद मिळाले तर बरे : हर्षवर्धन पाटील

पुणे ;माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी बुधवारी इंदापुरात कार्यकर्त्यांची बैठक बोलावली होती. याच बैठकीत पुढच्या आठ दिवसांत किंवा महिन्याभरात मला एखादे पद मिळाले तर तालुक्यातील सोडून गेलेला जो १० टक्के वर्ग आहे, तो पटापट माघारी फिरेल असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला आहे.हर्षवर्धन पाटील यांनी यावेळी काल काय झाले याचा विचार कधीच केला नाही, उद्या काय करायचे ते पाहू असेही वक्तव्य केले.

### तटकरेंना राज्यात फिरु देणार नाही

मुंबई : छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना मारहाण केल्याप्रकरणी निलंबित केलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे सुरज चव्हाण यांचे पुन्हा एकदा पुनर्वसन करण्यात आले आहे. आधी युवक प्रदेशाध्यक्ष असलेल्या सुरज चव्हाण यांना आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीसपदी निवड करण्यात आली आहे.सुनील तटकरे यांना राज्यात फिरू देणार नाही. अजित पवारांच्या शब्दाला पक्षात किंमत नाही, अशी टीका विजय घाडगे यांनी केली.

### तेंडुलकरचा मुलगा अर्जुनचं लग्न ठरलं!

मुंबई ;भारतीय क्रिकेटचा मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांचा मुलगा आणि क्रिकेटपटू अर्जुन तेंडुलकर याचा नुकताच साखरपुडा पार पडला. काही इंग्रजी माध्यमांनी दिली आहे. सानिया चांडोक ही मुंबईतील उद्योगपती रवि घई यांची नात आहे. अर्जुन आणि सानियाचा साखरपुडा एका खासगी समारंभात पार पडला, ज्यात दोन्ही कुटुंबाचे जवळचे सदस्य आणि मित्र उपस्थित होते. साराने तिच्या सोशल मीडियावर सानिया चांडोकसोबत काही फोटो शेअर केले आहे.

### आदिवासी भवनाबाहेर मोठा गोंधळ

नाशिक ;नाशिकमध्ये आदिवासी आंदोलक चांगलेच आक्रमक झाले आहेत. आदिवासी समाजाच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांकडून हे आंदोलन केलं जात आहेत. आंदोलकांचं तिरडी बांधून आंदोलन सुरु आहे. आदिवासी भवनाबाहेर शेकडो आदिवासी समाजाच्या कर्मचाऱ्यांचं आंदोलन सुरु आहे. यावेळी आंदोलकांकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात येत आहे. पोलिसांकडून आदिवासी भवन परिसरात मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### कबुतरखान्यावरील बंदी अगदी योग्यच!

मुंबई : कबुतरखान्यासंदर्भात उच्च न्यायालयाचा निर्णय आहे. त्याप्रमाणे सर्वांना वागावे लागेल. जैन मुनींनी या गोष्टीचा विचार करणे गरजेचे आहे. उच्च न्यायालयाने कबुतरखान्यांवर बंदी घातली आहे, तर त्याप्रकारे ती गोष्ट झाली पाहिजे , असे मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी सांगितले आहे. मनसे पदाधिका–यांच्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलत असताना राज ठाकरे यांनी आपली भूमिका मांडली.

### ९ फायटर पायलट्सना 'वीर चक्र'

नवी दिल्ली : ऑपरेशन सिंदूरवेळी आपल्या असामान्य शौर्याचा परिचय देणा–या हवाई दलाच्या योद्धयांना लष्करी पदक देऊन सलाम करण्यात आला आहे. हवाई दलाच्या ९ लढाऊ वैमानिकांना लष्करातील प्रतिष्ठेचे वीर चक्र पदक जाहीर झाले आहे. त्या ९ लढाऊ वैमानिकांची नावेही घोषित करण्यात आली आहेत.भारतीय हवाई दलाच्या ९ लढाऊ वैमानिकांना त्यांनी केलेल्या जबरदस्त कामगिरीबद्दल लष्करी सन्मान जाहीर झाला आहे.

# पीक विम्याची रक्कम मंजूर तरिही खात्यावर पैसे नाहीत

## शेतकऱ्यांत संताप, आणखी किती दिवस थांबणार

**पुणे । प्रतिनिधी**

**पीक विमा कंपन्यांच्या सोयीनुसार शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर पीक नुकसानभरपाई जमा करण्यात येत असल्याने अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. मागील खरीप व रब्बी हंगामातील पीक विम्याची रक्कम मंजूर झाली खरी मात्र त्यातील काहीच पैसे देण्यात आले. उर्वरीत पैसे अद्याप पर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर टाकण्यात आलेले नाहीत. यामुळे शेतकऱ्यांमधून संताप व्यक्त होत असून, आणखी किती दिवस वाट बघायची असा सवाल शेतकऱ्यांनी केला आहे.**




मागील खरीप व रब्बी हंगामातील ८८ हजार ४१२ शेतकऱ्यांना १०४ कोटी मंजूर असताना ६५ हजार ६२० शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर ८९ कोटी ८६ लाख ४० हजार रुपये जमा करण्यात आले आहेत. खरीप २०२४ हंगामातील पीक नुकसान दोन लाख ३९ हजार शेतकऱ्यांना २७९ कोटी रुपये पीक विमा कंपनीकडून मंजूर करण्यात आले आहेत. यातील रक्कम दोन महिन्यांखाली शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली, तर उर्वरित ६९ हजार ९५३ शेतकऱ्यांचे ८१ लाख ९५ हजार रुपये शासनाकडून मिळाल्यानंतर जमा करण्यात येतील, अशी भूमिका विमा कंपनीने घेतली होती. राज्य शासनाने ७ जुलैच्या आदेशान्वये खरीप हंगामाची संपूर्ण रक्कम ▶▶ पान २ वर

> **शेतकऱ्यांनी किती दिवस वाट बघायची?**
> मागील वर्षी जुलै महिन्यात विमा कंपनीकडे शेतकऱ्यांनी विमा भरला होता. ऑगस्ट–सप्टेंबर महिन्यात पीक नुकसान झाले होते. खरीप हंगामाचे २१ हजार शेतकऱ्यांचे ११ कोटी अद्याप वाटप झाले नाहीत. यावर्षीच्या खरीप हंगामाची काढणीला सुरुवात होण्याचे दिवस आले तरी मागील वर्षांचे पैसे जमा होत नाहीत. रब्बी हंगामातील पीक नुकसान भरपाईचीही अशीच स्थिती आहे. शेतकऱ्यांनी आणखी केती दिवस वाट बघायची, असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

# मुंबईला जाणार ओबीसीमधून आरक्षण घेणार–मनोज जरांगे

लातूर । प्रतिनिधी

सरकारने आम्हाला आरक्षण दिलं तर त्यांचे गुलाल लावून आभार मानणार, जर मागण्या मान्य झाल्या नाहीत तर मुंबईतून हालणार नाही असा निर्धार मनोज जरांगे यांनी केला. कुणीही आडवं आलं तरी आम्ही २९ ऑगस्ट रोजी मुंबईला जाणार आणि ओबीसीतूनच आरक्षण घेणार असंही जरांगे म्हणाले. लातूरमध्ये ते माध्यमांशी बोलत होते.



मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी २९ ऑगस्ट रोजी चलो मुंबईची हाक दिली. त्याच्या नियोजनासाठी ते ठिकठिकाणी बैठका घेत आहेत. जरांगे लातूरमध्ये असताना पालकमंत्री प्रताप सरनाईकांनी त्यांची भेट घेतली. मराठा समाजाच्या ज्या मागण्या आहेत त्या मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या कानावर घालू असा शब्द सरनाईकांनी दिला.मनोज जरांगे म्हणाले की, "आम्हाला ▶▶ पान २ वर

# बळीराजा खचला; एकाच दिवशी तीन आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात एकापाठोपाठ एक अशा तीन शेतकऱ्यांनी आपल्या आयुष्याचा शेवट केल्याने जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. गेवराई तालुक्यातील मीरगाव येथील एका तरुण शेतकऱ्याने विष प्राशन करून आपल्या आयुष्य संपवल्याची घटना समोर आली आहे. केज तालुक्यातील कोरेगाव आणि सांगावी येथील शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना आज एकाच दिवशी घडल्या .**



धुराजी पांडुरंग जगताप (वय–३५) रा. मिरगाव, ता. गेवराई, जि. बीड असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांच्याकडे अवघी दोन एकर शेती आहे. या शेतीतील उत्पन्नावर मुलाचा शैक्षणिक खर्च आणि मुलीच्या लग्नाच्या खर्चाचा भार उचलावा लागणार आहे. यातच त्यांनी मुलांच्या शिक्षणासाठी कर्ज मिळावे म्हणून बँकेकडे प्रस्ताव दाखल केला होता. बँक कर्ज देण्यास नकार दिला. ही चिंताही त्यांना सतावत होती, म्हणूनच त्यांनी स्वतःच्याच शेतातच कापसाची फवारणी करणारे कीटकनाशक औषध घेतले. शेतकरी धुराजी जगताप यांच्या पाश्चात्य पत्नी तीन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे..दरम्यान, जिल्ह्याच्या केज तालुक्यातील सांगवी येथे ७० वर्षीय शेतकऱ्याने गोठ्यात तर कोरेगाव येथे ४० वर्षीय शेतकऱ्याने शेतातील बाभळीच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या घटना समोर आल्या आहेत. सांगवी येथील पांडुरंग विठ्ठल केदार (वय ७०) या शेतकऱ्याने टोकाचे पाऊल उचलत बुधवारी दुपारी शेतातील ▶▶ पान २ वर

# पशुपालकात भीतीचे वातावरण
# राज्यात 'लम्पी' चे थैमान



**मुंबई । प्रतिनिधी**

पशुधनांमध्ये थैमान घालणारा 'लम्पी स्कीन' आजार राज्यात पुन्हा डोके वर काढतो आहे. पुणे, सातारा, परभणी, सिंधुदुर्ग आदी जिल्ह्यांतील पशुधनांना लागण झाली असून, त्यांना लसीकरण केले गेले आहे. उत्तर भारतातील गायपट्ट्यातून आलेली ही लाट पुढे देशभर पसरत केली. आता पुन्हा एकदा 'लम्पी' चर्मरोगाची दुसरी लाट राज्यात सुरू झाली आहे. यामुळे पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरलेले आहे. तथापि महाराष्ट्र गोवंशावर लसीकरण झाले असल्याने ही लाट पूर्वी इतकी तीव्र राहणार नाही. किंबहुना त्यावर उपचार करणे शक्य असल्याचे पशुसंवर्धन विभागाकडून सांगितले जात आहे. ▶▶ पान २ वर

## सार्थक थोरवे याची वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी निवड

**आष्टी । प्रतिनिधी**

राज्य गुणवत्ता यादीच्या आधारे जाहीर करण्यात आलेल्या कॉलेजमधून सार्थक स्वानंद थोरवे याने मुंबईच्या नामांकित अशा जीएस वैद्यकीय महाविद्यालय तथा केईएम कॉलेज मध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळवला आहे. सार्थक थोरवे याने राजर्षी शाहू महाराज ▶▶ पान २ वर



# निलंबित सुरज चव्हाणचे प्रमोशन

## युवा प्रदेशाध्यक्ष पदावरून थेट पक्षाचे सरचिटणीस पद

**मुंबई । प्रतिनिधी**

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधून एक मोठी बातमी समोर आली. मारहाणीचे आरोप असणाऱ्या आणि स्वत: अजित पवारांनी निलंबनाची कारवाई केलेल्या सुरज चव्हाण यांचे राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रमोशन करण्यात आल्याचे समोर आले आहे. यावरून आता विरोधक आक्रमक झाले असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आ. रोहित पवार यांनी अजित पवारांवर टीका केली आहे. तसेच, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीदेखील अजित पवारांवर टीका केली आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी ट्वीट करत निशाणा साधला. ते म्हणाले की, 'लातूरमध्ये केलेल्या गुंडगिरीप्रकरणी पदाधिका–याचा राजीनामा घेण्याचा अजितदादांचा ▶▶ पान २ वर

# वगळलेल्या ६५ लाख मतदारांची यादी जाहीर करा !

## सर्वोच्च न्यायालयाची निवडणूक आयोगाला फटकार आणि आदेशही

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

देशात सध्या 'व्होट चोरी' (मतांची चोरी) च्या आरोपांमुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले असताना, सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला कडक शब्दांत फटकारले आहे. बिहारमधील विशेष पुनरिक्षण मोहिमेच्या दरम्यान ६५ लाख मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. ही नावे कोणती आहेत, आणि त्यामागचे कारण काय आहे याची माहिती सर्वसामान्य जनतेसमोर यावी, असा आदेशच सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, ही नावे वेबसाईटवर किंवा सार्वजनिक फलकावर का टाकू नये? ज्या नागरिकांना त्रास झाला असेल, ते ३० दिवसांत दुरुस्ती करू शकतात, असे स्पष्ट शब्दांत न्यायमूर्तींनी निवडणूक आयोगाला सुनावले. न्यायालयाने असेही म्हटले



की, नागरिकांच्या मतदानाच्या अधिकारावर राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून राहता कामा नये. नागरिकांना स्वतःहून यादीतील चुकांची दुरुस्ती करता यावी, हीच खरी लोकशाही आहे. यावर निवडणूक आयोगाने सांगितले की, मृत, स्थलांतरित किंवा इतर मतदारसंघात गेलेल्या मतदारांची यादी स्थानिक स्तरावर राजकीय पक्षांना दिली जाते. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या टिप्पणीमुळे आता आयोगाने जाहीरपणे ही यादी वेबसाईटवर व जिल्हास्तरावर प्रसिद्ध करण्यास सहमती दर्शवली आहे. आयोगाने असेही म्हटले की, सध्या राजकीय वातावरण खूप ध्रुवीकरण झालेले आहे. पक्ष जिंकले तर ईव्हीएम मान्य करतात, हरले तर दोष देतात, अशी परिस्थिती आहे. ▶▶ पान २ वर

# हाय सिक्युरिटी नंबर प्लेट ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

**पुणे । प्रतिनिधी**

**हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवण्यासाठी अखेर मुदतवाढ देण्यात आली असून, आता ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत ही मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानंतर मात्र १ डिसेंबर पासून कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती आरटीओ कार्यालयाच्या वतीने देण्यात आली. आता वाहनधारकांना ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंतची सवलत मिळाली असली तरी, ही शेवटची संधी असल्याचे स्पष्ट संकेत प्रादेशिक परिवहन कार्यालयाने दिले आहेत.**

राज्यभरात वाहनांची सुरक्षा आणि ओळख प्रमाणित करण्यासाठी बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, अनेक वाहनधारकांनी अद्याप या नियमाची पूर्तता केलेली नाही. वाहनधारकांची ही




उदासीनता आणि तांत्रिक अडचणी लक्षात घेता, शासनाने पुन्हा एकदा मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत तीन वेळा मुदतवाढ दिली असून ३० तारीख ही चौथी वेळ मुदतवाढ राहणार आहे. यानंतर मात्र मुदतवाढ मिळणार नसून १ डिसेंबर पासून कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती आरटीओ कार्यालयाच्या वतीने देण्यात आली. १ डिसेंबर २०२५ पासून वाहनांवर कडक ▶▶ पान २ वर

## सुटीची सूचना

**आज दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्य दिन असल्यामुळे दैनिक राज्य लोकतंत्र कार्यालयास सुटी आहे. त्यामुळे उद्या दि. १६ ऑगस्ट २०२५ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी नोंद घ्यावी.**

– व्यवस्थापक

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१४ ऑगस्ट २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू: ४५.५० क्विंटल | | |
| २,५५० | २,८७६ | २,६७० |
| ज्वारी/हायब्रिड :२३.५० क्विंटल | | |
| २,१२० | ३,४५० | २,५४४ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | | |
| २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : १.०० क्विंटल | | |
| ६,१५० | ६,१५० | ६,१५० |
| उडीद : १.५० क्विंटल | | |
| ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ३४.५० क्विंटल | | |
| २,००० | २,९६० | २,६४२ |
| मुग: १.०० क्विंटल | | |
| ७,१५० | ७,१५० | ७,१५० |
| सोयाबीन: ४.५० क्विंटल | | |
| ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| हरभरा: १०.५० क्विंटल | | |
| ५,५०१ | ६,००१ | ५,८४३ |

# देश बदलायचा असेल तर शेतकरी आर्थिक उन्नत झाला पाहिजे–जलनायक गांधी




**परळी वै.। प्रकाश वर्मा**

**जुन्या काळात आपला देश हा "सोने की चिडिया" म्हणून ओळखला जायचा. मध्यंतरीच्या काळात कालानुरूप बदल होत गेले. येथील लोकजीवन, वातावरण, पर्यावरणातील बदल आणि संसाधनांमध्ये खूपच मोठे बदल झाले आहेत. आज देशाची अवस्था सुधारण्यासाठी अनेक स्तरावरून प्रयत्न होतात. अनेक लोकसेवी संस्था आणि लोकसेवक सुधारणावादी काम करत असल्याचे पाहायला मिळते. मात्र जर देशाला घडवायचे असेल तर सर्वप्रथम शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था सुधारली पाहिजे असे मत ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांनी व्यक्त केले.**

सिरसाळा येथील कृषिकुल येथे आयोजित "संवाद माध्यम प्रतिनिधींशी" या कार्यक्रमात जिल्हाभरातून उपस्थित असलेल्या पत्रकार बांधवांशी संवाद साधत असताना ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र शेती सहाय्य मंडळाचे विश्वस्त विजय अण्णा बोराडे, ग्लोबल विकास ट्रस्टचे विश्वस्त हरिश्चंद्र वंगे यांची उपस्थिती होती.कृषिकुल येथे आयोजित केलेला "संवाद माध्यम प्रतिनिधींशी" कार्यक्रम बुधवारी पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित असलेल्या पत्रकार ▶▶ पान २ वर

> **शेतकऱ्यांच्या भविष्यासाठी "कृषिकुल"**
> जगातील सर्वात हिम्मतवान माणूस जर कोण असेल तर तो शेतकरी. मातीत घाम गाळायचा, राबराब राबायचे, काबाडकष्ट करायचे असाच त्याचा जीवनप्रवास असतो. तो कायम अडचणीत आणि आर्थिक विवंचनेत असतो. मात्र असे असतांनाही तो कधी कोणावर नाराज होत नाही. आता त्याच्या जीवनात आनंदाचे क्षण आणायचे असा आपण पक्का निश्चय केलेला आहे. त्यांना शाश्वत शेतीचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण कृषिकुलच्या माध्यमातून आम्ही देत आहोत. शेतकऱ्यांनी इथं यावं, शिकावं आणि आधुनिक पद्धतीने शाश्वत शेती करून आर्थिक उन्नती साधावी असेही मयंक गांधी म्हणाले.

cmyk

## अग्रलेख

# भटक्यांनाही सहानुभूती मिळण्याचा अधिकार

१४० कोटींपेक्षा अधिक लोकसंख्येच्या भारतामध्ये सध्या मानवी समस्यांपेक्षाही प्राण्यांना भेडसावत असलेल्या समस्यांवर जास्त चर्चा घडत आहेत. कोल्हापूर येथील नांदणी मठातील महादेवी हत्तीचा विषय असो किंवा मुंबईतील दादर येथील कबुतरखान्याचा विषय असो या विषयांना संपूर्णपणे पूर्णविराम मिळण्यापूर्वीच आता भटक्या कुत्र्यांचा विषय समोर आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी भटक्या कुत्र्यांबाबत दिलेल्या एका आदेशामुळे ही चर्चा सुरू झाली आहे. राजधानी नवी दिल्लीतील सर्व भटकी कुत्री आठ आठवड्यांच्या आत पकडून त्यांना एका वेगळ्या आश्रयस्थानाकडे पाठवावे अशा प्रकारचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर या आदेशावर मोठ्या प्रमाणात टीका झाली. बुधवारी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यासमोर हा विषय आला असता त्यांनी आपण या प्रकरणात लक्ष घालू, असे सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्याच एका न्यायाधीशानी हा निर्णय दिला असल्याने या विषयात व्यवस्थित लक्ष घालून निर्णय घ्यावा लागेल, असे संकेत सरन्यायाधीशांनी दिले आहेत. अर्थात, सर्वोच्च न्यायालयाच्या मूळ आदेशानंतर देशात सर्वत्र श्वानप्रेमींनी निषेधाची भूमिका घेतली आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्राण्यांसाठी नेहमीच झटणाऱ्या मनेका गांधी आणि विविध सेलिब्रिटी यांनी न्यायालयाच्या या आदेशावर टीका केली आहे. भटकी कुत्री ही एक समस्या असली, तरी त्या समस्येवर उपाय शोधण्यासाठी अशा प्रकारे कारवाई करणे योग्य नव्हे असेच अनेकांचे मत आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे गेल्या वर्षीसुद्धा हा विषय सर्वोच्च न्यायालयासमोर आला असताना एका न्यायाधीशानी थोडा वेगळा निर्णय दिला होता आणि भटक्या कुत्र्यांकडेसुद्धा सहानुभूतीने पाहणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले होते. पण हा आताचा सर्वोच्च न्यायालयाचा जो निर्णय आहे त्या निर्णयाला अनेक कंगोरे आहेत. कारण दीर्घकाळापासून भारतासारख्या देशामध्ये कुत्री आणि मानव यांचे सहजीवन सुरू आहे. सामान्य नागरिकांना भटक्या कुत्र्यांचा त्रास होतो याबाबत कोणतीही शंका नसली, तरी कुत्र्यांना संपूर्णपणे रस्त्यावरून बाजूला करून अन्यत्र हलवणे हा या समस्येवरील उपाय आहे का, याचा विचार केला जावा अशीच तज्ज्ञांची मागणी आहे. भटक्या कुत्र्यांची समस्या सोडवण्यासाठी इतर अनेक उपाय उपलब्ध आहेत. त्यामध्ये कुत्र्यांचे निर्बीजीकरण करणे, नसबंदी करणे किंवा लसीकरण करणे अशा अनेक गोष्टी करता येऊ शकतात. पण या सर्व गोष्टी बाजूला सारून जर कुत्र्यांनाच रस्त्यांवरून उचलून एखाद्या वेगळ्या आश्रयस्थानामध्ये ठेवले तर ती क्रूरता ठरेल असेच अनेकांचे मत आहे.

गेल्या वर्षी एका प्रख्यात उद्योगपतीचा मृत्यू भटक्या कुत्रा चावल्यामुळे झाल्यानंतर हा विषय प्राधान्याने समोर आला होता. आता हा विषय चर्चेला आल्यानंतर गेल्या काही दिवसांमध्ये देशात अनेक ठिकाणी भटक्या कुत्र्यांनी माणसांवर केलेल्या हल्ल्याच्या बातम्याही प्रसिद्ध होत आहेत. लहान मुलांना कुत्र्यांनी पळवणे किंवा त्यांच्यावर हल्ला करून त्यांना ठार मारणे किंवा भटक्या कुत्र्यांनी घेतलेल्या चाव्यामुळे रेबीजसारखा रोग होणे याची नेहमीच चर्चा होत राहते. काही वर्षांपूर्वी जेव्हा हा विषय चर्चेला आला होता तेव्हा कुत्र्यांची नसबंदी किंवा निर्बीजीकरण या विषयालासुद्धा विरोध करण्यात आला होता आणि तीसुद्धा प्राण्यांसाठी क्रूरता आहे असे काही जणांचे म्हणणे होते. पण ज्या प्रकारे रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांची संख्या वाढत आहे ते पाहता संख्या नियंत्रित करण्यासाठी नसबंदी आणि निर्बीजीकरण हे उपाय आधुनिक काळामध्ये योग्य वाटू शकतात. अर्थात, जेवढी भटकी कुत्री आज रस्त्यांवर फिरताना आढळतात त्याच्या काही प्रमाणामध्ये तरी घराघरांमध्ये पाळीव श्वानसुद्धा असतात. पाळीव कुत्र्यांना जेवढ्या वैद्यकीय सोयी आणि सुविधा उपलब्ध होतात तेवढ्या त्या भटक्या कुत्र्यांना उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे अनेक वेळा ह्या कुत्र्यांना व्यवस्थित खायलाही मिळत नाही, पाणी मिळत नाही आणि विविध प्रकारच्या रोगांशी सामना करावा लागतो. भारतामधील अनेक शहरांमधील रस्त्यावर जे फूड स्टॉल आहेत तेथील शिल्लक अन्नावरच अनेक वेळा या भटक्या कुत्र्यांची गुजराण होते. जर काही कारणाने या कुत्र्यांना अन्न उपलब्ध झाले नाही तर ती हिंसक होऊ शकतात. त्यातूनच कुत्र्यांनी माणसांवर हल्ले करण्याचे प्रकार वाढीस लागतात. साहजिकच पाळीव कुत्र्यांना ज्या प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध होतात त्याच प्रकारच्या सोयीसुविधा किमान अन्न, पाणी आणि योग्य औषधोपचार जर भटक्या कुत्र्यांना मिळाले झाले तर या विषयाची तीव्रता कमी होऊ शकते. कुत्र्यांचा त्रास कमी करण्यासाठी त्यांना संपूर्णपणे रस्त्यावरून उचलून अन्यत्र नेणे हा योग्य पर्याय असू शकत नाही. ह्या विषयाला जर पूर्णविराम मिळवायचा असेल तर विचारपूर्वक आणि संशोधन करूनच निर्णय घ्यावा लागणार आहे. अनेक पाश्चिमात्य देशांमध्ये किंवा अमेरिकेसारख्या मोठ्या देशांमध्ये रस्त्यावर भटकी कुत्री दिसत नाहीत हे वास्तव आहे. अशा देशांमध्ये भटक्या कुत्र्यांबाबत काय धोरण आहे आणि तेथील भटक्या कुत्र्यांचे नियोजन कसे केले जाते याचा विचार यानिमित्ताने करणे गरजेचे आहे. कारण देशातील इतर शहरांमध्येसुद्धा अशा प्रकारचा आदेश दिला जाऊ शकतो. म्हणूनच या विषयावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी अभ्यासपूर्ण संशोधन करावे लागणार आहे. माणसालाही भटक्या कुत्र्यांचा त्रास होणार नाही आणि भटक्या कुत्र्यांना वनवासात पाठवावे लागणार नाही या दोन्ही बाजूंचा समन्वय साधूनच निर्णय घ्यावा लागणार आहे.

# माऊलींचा सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सव

**संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जयंतीनिमित्त आपेगाव , नेवासा , आळंदी , पंढरपूर आदी ठिकाणी वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे . सन २०२५ हे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी ( ७५० वी ) जयंतीचे वर्ष आहे . ही जयंती १५ ऑगस्ट २०२५ रोजी , ‘‘गोकुळ अष्टमी‘‘च्या दिवशी साजरी होईल . महाराष्ट्र शासनाने या वर्षी सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ‘‘महोत्सव‘‘ स्वरूपात साजरा करण्याचे परिपत्रक काढले आहे . मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने नगर विकास विभागाने हे आदेश जारी केले आहेत.**

स्थानिक स्वराज्य संस्था , शाळा-महाविद्यालये , वारी परंपरेशी जोडलेल्या संस्था , तसेच सांस्कृतिक संघटनांच्या सहभागातून कीर्तन-महोत्सव , ओवी-वाचन , स्वच्छता-सप्ताह , वृक्षारोपण , ग्रंथ-प्रदर्शने आणि युवकांसाठी निबंध-स्पर्धा , वक्तृत्व-स्पर्धा, पोस्टर-मोहिमा अशा कार्यक्रमांना सुरुवात होत आहे . या सोहळ्याचा केंद्रबिंदू म्हणून माऊलींची जन्मभूमी आपेगाव ता पैठण हे खास प्रकाशझोतात येत असून , नेवासामध्ये ज्ञानेश्वरी पठण आणि आळंदीत संजीवन-समाधी स्मरण सोहळे आयोजित केले जात आहेत. संत ज्ञानेश्वर यांचा जन्म इ.स. १२७५ ( शके ११९७) , आपेगावविठ्ठलपंत-रुख्मिणी दांपत्याच्या पोटी झाला. त्यांना भाऊ-बहिणी निवृत्तिनाथ , सोपानदेव , मुक्ताबाई हे होत . निवृत्तिनाथ यांनी नाथ संप्रदायातील गहिनीनाथ यांच्याकडून दीक्षा घेतली ; ज्ञानेश्वरांनी निवृत्तिनाथांनाच आपले गुरु मानले . इ.स. १२९० मध्ये संत ज्ञानेश्वर यांनी नेवासा येथे ‘ज्ञानेश्वरी ( भावार्थ-दीपिका ) रचली हे भगवद्गीतेवरील मराठी टिपणग्रंथ , ओवीछंदात आहे . पुढे ‘अमृतानुभव’ ही तत्त्वज्ञानप्रधान कृति रचली . इ.स. १२९६ मध्ये आळंदी येथे संजीवन-समाधी घेतली . वारी - परंपरेतील आळंदी-पंढरपूर पालखी परंपरेचे केंद्रस्थान आहे . ज्ञानेश्वरांनी मराठीला धर्म-तत्त्वज्ञान व्यक्त करणारी समर्थ भाषा म्हणून प्रतिष्ठा दिली . ओवी या जनभाषेतील छंदात त्यांनी गीतेचे अर्थसुंदर रूप दिले ; यात लोकभाषा , उपमा-अलंकार , आणि तात्त्विक सूक्ष्मता यांचा अप्रतिम संगम दिसतो . अमृतानुभव - मध्ये अद्वैत , आत्म-ब्रह्म ऐक्य , नाम-भक्ती आणि अनुभवप्रधान अध्यात्म यांचे सूक्ष्म विवेचन आढळते ; तर चांगदेव पासष्टी ही ६५ ओव्यांची उपदेशरूपी रचना नम्रता - अहंकारमुक्तीचा संदेश देते . चांगदेवाशी झालेल्या प्रसंगाचे वर्णन ‘‘ भिंतीवर आरूढ होऊन माउलींनी त्यांचा दर्प निववला ’’ वारकरी परंपरेत प्रसिद्ध आहे . संत ज्ञानेश्वर यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना बाल्यावस्था : कुटुंबावर सामाजिक



बहिष्कार ; तरीही चारही भावंडांमध्ये अध्यात्म-वैराग्याची ज्योत प्रज्वलित केली. नेवासा ( इ.स. १२९०) येथे गंगाकाठी प्रवरानदीच्या काठी ज्ञानेश्वरीचा अखंड नाम - स्मरणात झालेला प्रवाह ; माउली बोलतात , श्रोते लिहितात सच्चिदानंद या शिष्यानं लेखन केल्याचा उल्लेख परंपरेतआहे . पैठण/चांगदेव प्रसंग : योगसिद्धीपेक्षा भक्ती-ज्ञानाचे श्रेष्ठत्व दाखवणारी ‘भिंत चालली’ ही लोककथा ; याच पार्श्वभूमीवर पासष्टी आहे . माऊलींनी आळंदी (इ.स. १२९६) येथे संजीवन-समाधी घेतली . संत ज्ञानेश्वर यांचे प्रमुख ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत . १ . ज्ञानेश्वरी (भावार्थ-दीपिका) १८ अध्याय , गीतेचा लोकभाषेतील अर्थ यात आहे . करुणा , कर्तव्य , नामस्मरण आणि समत्व-योग यांचे सुलभ विवेचन यात आहे . २. अमृतानुभव अनुभवप्रधान अद्वैत , ‘कथनी’पेक्षा ‘करणी’ला प्राधान्य ; शब्दापलीकडील अनुभूतीचा शोध यात घेतलेला दिसतो . ३.चांगदेव पासष्टी अहंकारनिर्मूलन, विवेक-वैराग्य , सदाचार यांचा सार म्हणजे वरील ग्रंथ होय. वारकरी परंपरा, समाजप्रबोधन आणि आजचे संदर्भ :- माउलींच्या विचारांत समत्व , मैत्री , परस्पर-भाईबंदकी , सत्कर्माची आवड आणि सर्वकल्याणाचा ध्यास ठळकपणे येतो . वारीतील दिंडी , नामघोष , सामुदायिक श्रमदान , स्वच्छता यांचे सामाजिक-शैक्षणिक महत्त्व आज अधिकच प्रखर झाले आहे . पसायदान ही त्यांच्या विचारांची मूर्त प्रार्थना धर्म-पंथांपलीकडचा मानवतावादी आशयआजच्या सार्वजनिक जीवनाला दिशादर्शक ठरते . माउलींच्या निवडक ‘ओव्या’ (पसायदानातून ) ‘आता विश्वात्मके देवे, येणे वाग्यज्ञे तोषावे ; तोषोनि मज द्यावे, पसायदान हे . ’’ ‘‘जे खळांची व्यंकटी सांडो, तयां सत्कर्मी रती वाढो ; भूतां परस्परे जडो, मैत्र जीवांचे . ’’ ‘‘दुरितांचे तिमिर जावो, विश्व स्वधर्म सूर्ये पाहो; जो जे वांछील तो ते लाहो , प्राणिजात. ’’ ‘‘वर्षत सकळ मंगळी , ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ; अनवरत भूमंडळी, भेटतु भूतां . ’’ ‘‘चलां कल्पतरूंचे आरव, चेतना चिंतामणींचे गाव; बोलते जे अर्णव, पीयूषाचे . ’’ ‘‘चंद्रमे जे अलांच्छन, मार्तंड जे तापहीन; ते सर्वांही सदा सज्जन, सोयरे होतू . ’’ ७५० वी जयंती : काय-काय विशेष ? १५ ऑगस्ट रोजी जन्मभूमी आपेगांव -आळंदी - नेवासा जोडणारी ‘ ज्ञानयात्रा ’ : ग्रंथ व हस्तलिखित प्रतिकृतींचे प्रदर्शन , प्रवचनमाला असेल . विद्यार्थी उपक्रम : ‘ओवी बोलाओवी लिहा’, हस्ताक्षर-स्पर्धा , ‘ ज्ञानेश्वरीतलं विज्ञान ’ विषयक प्रात्यक्षिके होतील . सामुदायिक सेवा जसे की नदी-स्वच्छता , वृक्षारोपण , हरित-दिंडी , रक्तदान शिबिरे घेतली जातील . कीर्तन-महोत्सव होतील. वारी परंपरेतील कीर्तनकार , भजन-मंडळे , दिंडी-नृत्य, भारूड यांचे सादरीकरण होणार आहे . का वाचावी ‘ज्ञानेश्वरी’? - भाषेची आपुलकी वाढवणारी प्रत्यक्ष जीवनातील उदाहरणांनी समजावलेला कर्म - भक्ती -ज्ञान -योग अगदी आजच्या विद्यार्थ्यांपासून तरुण व्यावसायिकांपर्यंत सर्वांसाठी वाचनीय आहे म्हणून वाचावी . ही लोकशिक्षणाची परंपरा आहे . ग्रंथाभोवती उभा राहिलेला वाचन-सप्ताह , पारायण , कीर्तन यांचा लोकशाही स्वरूपाचा अभ्यासक्रम आहे . यातून मानवतावाद वाढतो . ‘मी-तू’ भेद निववून मैत्र , सत्कर्म , सर्वकल्याण यांचा आग्रह पसायदानात आहे. शेवटची समर्पक आठवण :- माउलींच्या ७५० व्या जयंतीचा उत्सव केवळ धार्मिक नाही ; तो भाषा-संस्कृती - मानवतेचा महोत्सव आहे . प्रत्येक शाळा , ग्रामसभा , संस्था आणि घराघरांत ‘ओवी-वाचन’ सुरू झाले तरच ही जयंती खऱ्या अर्थाने उजळेल . ‘‘किंबहुना सर्व सुखी’’ या माउलींच्या सार्वत्रिक आशीर्वादात आजचा महाराष्ट्रही सामील होवो !



**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

# तटकरेच्या तोंडाला काळे फासणार

## छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक रोमन यांचा इशारा

**बीड । प्रतिनिधी**

**खासदार सुनील तटकरे यांच्या पत्रकार परिषदेच्या वेळी छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी पत्ते फेकल्याने तत्कालीन राष्ट्रवादीचे युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण आणि काही कार्यकर्त्यांनी मिळून विजयकुमार घाडगे यांना मारहाण केली होती. घाडगे यांना रुग्णालयात दाखल करावे लागले होते. या मारहाणीची दखल घेत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी सूरज चव्हाण याला पक्षातून निलंबित केले होते. मात्र सुनिल तटकरे यांनी पुन्हा सुरज चव्हाण याची नियुक्ती करून त्याला मोठ पद दिल आहे. याचा निषेध छावा मराठा संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. सुनिल**



**तटकरे बीडमध्ये आल्यानंतर त्यांच्या तोंडाला काळे फासू असा इशारा छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक रोमन यांनी दिला आहे.**

२१ जुलैला अजित पवारांनी सूरज चव्हाण यांचे निलंबन केले. मात्र, या निलंबनाला तीन आठवडे होण्याच्या आधीच सूरज चव्हाणचे यांचे थेट पदोन्नती करत त्याची राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली. सुनिल तटकरे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले. चव्हाण यांना निलंबित केल्यानंतर पुन्हा त्यांच्यावर मोठी जबाबदारी टाकत सरचिटणीस केल्यानंतर सुनिल तटकरे यांच्यावर टीका होत आहे. छावाचे जिल्हाध्यक्ष अशोक रोमन यांनी या नियुक्तीवरून संताप व्यक्त केला आहे. ते म्हणाले मारामाऱ्या करणाऱ्यांना पक्षातून हाकालपट्टी करण्याऐवजी जर मोठं पद दिले जात असल्याने आम्ही जेंव्हा केंव्हा सुनिल तटकरे बीडमध्ये येतील तेंव्हा त्यांच्या तोंडाला काळे फासणार आहोत.



# जालन्यात भाजपातर्फे तिरंगा पदयात्रा उत्साहात

जालना । प्रतिनिधी

स्वातंत्र्य दिनानिमित्त भारतीय जनता पार्टीतर्फे ‘‘हर घर तिरंगा‘‘ अभियानांतर्गत तिरंगा पदयात्रा मोठ्या उत्साहात काढण्यात आली.या पदयात्रेची सुरुवात सरस्वती भुवन शाळेतून झाली. मार्गक्रमण करत हुतात्मा स्मारक, लोकमान्य टिळक स्मारक, स्व. भगवंतराव गाढे स्मारक(माजी मंत्री), सावित्रीबाई फुले स्मारक आणि महात्मा गांधी स्मारक येथे पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले व त्यानंतर ही पदयात्रा पुन्हा सरस्वती भुवन शाळेत येऊन संपन्न झाली.

या पदयात्रेत भाजपा नेते माजी आमदार कैलासजी गोरंट्याल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, अक्षय गोरंट्याल यांच्यासह देशभक्त नागरिक, आजी-माजी पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या पदयात्रेचे आयोजन जुना जालना मंडळ अध्यक्ष महेश निकम यांनी केले. देशभक्तीच्या घोषणा आणि राष्ट्रीय ध्वजाच्या फडक्यात ही पदयात्रा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

## बदनापूरमध्ये वेश्याव्यवसायावर पोलिसांची धडक मोहीम!

# शिवराज हॉटेलवर छापा;सहा जण ताब्यात

**जालना । प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगरबदनापूर महामार्गावर बदनापूर येथे गेली दोन वर्षे बेकायदेशीर देहविक्री व्यवसाय राजरोस सुरू असल्याच्या तक्रारींना अखेर पोलीसांनी आळा घातला आहे. नवीन पोलीस निरीक्षक मच्छिंद्र सुरवसे यांच्या इशाऱ्यानंतरही सुरू असलेल्या या अवैध धंद्यावर बुधवारी रात्री धडक कारवाई करत पोलिसांनी शिवराज हॉटेलवर छापा टाकला. कारवाईत तीन महिला आणि तीन पुरुष पोलिसांच्या ताब्यात आले.**



बदनापूर तालुक्यात जुगार, मटका आणि वेश्याव्यवसाय यांसारख्या अवैध धंद्यांनी गेल्या काही वर्षांत डोके वर काढले होते. नागरिकांनी वारंवार तक्रारी करताना, यावर ठोस कारवाई व्हावी अशी मागणी केली होती. याआधी तत्कालीन पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांना आमदार नारायण कुचे यांनी कडक इशारा दिला होता; परंतु धंदे काही दिवस बंद ठेवून पुन्हा जोमाने सुरू करण्यात आले. जुलै महिन्यात मच्छिंद्र सुरवसे यांनी पोलीस निरीक्षक म्हणून पदभार स्वीकारताच महामार्गावरील बियर बार व लॉजिंग चालकांना ‘‘देहविक्री व्यवसाय तात्काळ बंद करा, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल‘‘ असा दम भरला होता. मात्र, काही व्यावसायिकांनी हा इशारा धुडकावून लावला. संध्याकाळी शिवराज हॉटेलमध्ये देहविक्री सुरू असल्याची माहिती मिळताच, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने छापा टाकला. या कारवाईत सहा जणांना ताब्यात घेऊन, गुन्हा करण्यात आला.

# पान १ वरून...

## पीक विम्याची रक्कम मंजूर तरिही

विमा कंपनीकडे जमा केली. विमा कंपनीने मात्र ४९ हजार शेतकऱ्यांचे ७१ कोटी पाच लाख रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केले. रब्बी हंगामातील १८,५०० हजार शेतकऱ्यांना २२ कोटी रुपये मंजूर आहेत. विमा कंपनीने १६ हजार ६८१ शेतकऱ्यांच्या खात्यावर १८ कोटी ८२ लाख रुपये जमा केल्याचे सांगण्यात आले.

-----------

## बळीराजा खचला; एकाच दिवशी

गोठ्यात आडूला धोतराने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे उघडकीस आले. तर दुसऱ्या घटनेत कोरेगाव येथे बाळू कारभारी साबळे (वय ४०) या शेतकऱ्याने शेतातील बाभळीच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली.

--------------

## मुंबईला जाणार ओबीसीमधून

आरक्षण दिलं तर सरकारचं गुलाल लावून आभार मानणार. कुणीही आडवं आलं तरी आम्ही मुंबईला जाणारच. माझा जीव गेला तरीही मी मुंबईत जाणारच. आझाद मैदानात बसून आरक्षणाची लढाई लढणार. यावेळी ओबीसीतून मराठ्यांना आरक्षण घेऊनच परत येणार. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताना म्हणाले की, ‘‘माणूस किती दलबदलू असावा याचं जिवंत उदाहरण म्हणजे देवेंद्र फडणवीस. त्यांनी तसं वागू नये. त्यांना सत्तेवर ठेवायचं नसतं तर मराठ्यांनी त्यांना मुख्यमंत्री केलं असतं का? त्यांच्या मनात काय आहे ते माहिती नाही. पण आम्ही शांततेत मुंबईत जाणार, आरक्षण घेणार. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पोलीस बघून घेतील. सत्ता असेल तर सगळं काही करता येईल या गैरसमजातून त्यांनी बाहेर यावं. तुम्ही एखाद्याला हात लावून दाखवा, मग सांगतो असा इशारा जरांगेंनी दिला.

----------------

## निलंबित सुरज चव्हाणचे प्रमोशन

निर्णय योग्यच होता. पण महिनाभराच्या आतच त्या वादग्रस्त पदाधिकाऱ्याचे प्रमोशन केले जात असेल तर याला काय म्हणायचे?असा सवाल त्यांनी यावेळी केला. तसेच ते पुढे म्हणाले की,‘अजितदादांच्या पक्षात दोन गट असून दुसरा भाजपप्रेमी गट जाणूनबुजून अजितदादांची प्रतिमा खराब करण्यासाठी कार्यरत असतो. शब्दाला पक्का या अजितदादांच्या प्रतिमेला धक्का देण्यासाठी कालची वादग्रस्त नियुक्ती केली गेली अशी चर्चा आहे. मारहाण करताना फ्रॅक्चर झालेल्या हातावरील प्लास्टरचा पट्टा निघण्याच्या आतच प्रमोशन केले, नियुक्ती करणाऱ्याच्या हिमतीला दाद द्यावी लागेल. शेवटी विनाशकाले विपरीत बुद्धी, असे म्हणत टीका केली.

-----------

## सार्थक थोरवे याची वैद्यकीय

लातूर येथे अकरावी, बारावीचे शिक्षण विज्ञान शाखेतून घेतले असून त्याने राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या वैद्यकीय प्रवेश परीक्षेत उत्तुंग यश मिळवत ५८५ गुण प्राप्त केल्याने त्याची निवड या अभ्यासक्रमासाठी झाली आहे. सार्थकच्या या यशाबद्दल त्याचे आजोबा माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे, बीडचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन खाडे,माजी शिक्षण संचालक दिगांबर देशमुख,दिनकर टेमकर,नवनाथ औताडे,गटशिक्षण अधिकारी सीमा काळे,रमेशसिंह भगत, सुरेश पवार,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांनी अभिनंदन केले. पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.सार्थक थोरवे याचे प्राथमिक शिक्षण आष्टी जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले असून माध्यमिक शिक्षण आष्टी येथील श्रीगणेश विद्यालयात झाले.

-----------

## हाय सिक्युरिटी नंबर प्लेट

कारवाईची मोहीम हाती घेतली जाणार आहे. या मोहिमेअंतर्गत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल असेही विभागाने काढलेल्या परिपत्रकात म्हटले आहे.

------------

## वगळलेल्या ६५ लाख मतदारांची

सर्वोच्च न्यायालयाने आयोगाला सुचवले की, ज्या वेबसाइटवर किंवा कार्यालयात ही माहिती उपलब्ध असेल, त्याबाबत सार्वजनिक सूचना द्याव्यात. त्यामुळे नागरिकांना वेळेत आपली नावे तपासता आणि तक्रार करता येईल.

**आयोगावर आता अधिक पारदर्शकतेचा दबाव**

सध्या विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगावर मोठे आरोप केले आहेत. काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी काही दिवसांपूर्वीच ‘व्होट चोरी’ झाल्याचा आरोप केला होता. त्यांनी म्हटले होते की, आयोग मतदारांची नावे चुकीने काढतो आहे, जेणेकरून सत्ताधाऱ्यांना फायदा होईल. त्यावर निवडणूक आयोगाने नेहमीप्रमाणे आरोप फेटाळले असले तरी आता सर्वोच्च न्यायालयाच्या या कठोर टिप्पणीमुळे आयोगावर अधिक पारदर्शकतेचा दबाव आला आहे.

**जनतेचा सहभाग वाढणार**

बिहारमध्ये १८ लाख मृत मतदार, ७ लाख डुप्लिकेट नावे असल्याची धक्कादायक माहिती यापूर्वीच समोर आली होती. आता ६५ लाख मतदारांची नावे यादीतून वगळली जात असताना, ही यादी लोकांसाठी खुले करण्याचा निर्णय महत्त्वाचा आहे. विरोधकांचा दावा आहे की, आयोग सत्ताधाऱ्यांना मदत करत आहे. मात्र आता नागरिकांना स्वतः त्यांची नावे तपासण्याची संधी मिळणार असल्याने जनतेचा सहभाग वाढणार आहे. दरम्यान, नागरिकांनी आता आपल्या मतदार यादीतील नावाची खातरजमा करणे गरजेचे असून, काही त्रुटी आढळल्यास ३० दिवसांच्या आत तक्रार करता येणार आहे.

-------------

## देश बदलायचा असेल तर शेतकरी आर्थिक

बांधवांचे शेतकरी टोपी आणि रुमाल देऊन स्वागत करण्यात आले. पुढे बोलताना जलनायक मयंक गांधी म्हणाले की, मी सुरुवातीला देश पातळीवर राजकीय जीवनात काम केले आहे. परंतु राजकारणाची परिभाषा, त्यातील खेळ आपल्याला अजिबात जमणार नाहीत हे माझ्या जेव्हा लक्षात आले तेव्हा मी ते सोडून दिले. मला खेड्यातील गरीब शेतकऱ्यांसाठी काम करायचे होते. तशी इच्छा उत्पन्न झाल्यानंतर ते कुठे करायचे? असाही प्रश्न पडला. तेंव्हा महाराष्ट्रातील सर्वात दुष्काळी भाग म्हणून मराठवाडा ओळखला जायचा, त्यातला त्यात बीड जिल्हा. म्हणून असा एक विचार आला की याच भागाला आपण बदलूया. जर आपण हे करू शकलो तर आपण देशात कुठेही काम करू शकतो असे माझ्या लक्षात आले आणि २०१६ पासून मी इथे काम करतोय. सुरुवातीच्या काळात काही मोजक्या गावात लोकांना सोबत घेऊन काम केले. त्यानंतर कामाची व्याप्ती वाढत गेली आणि आजही वाढतच आहे. आज आम्ही ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून जवळपास ४ हजार गावांमध्ये पोहचू शकलो आणि तिथे काम करत आहोत. जलसंधारणासाठी वेगवेगळ्या गावात आणि नद्यांवर काम केल्यानंतर करोडो लिटर पाणी जमिनीत मुरले आणि पाण्याची पातळी वाढलेली आहे. ज्याचा फायदा शेतकऱ्यांच्या पिकांसाठी झाला. पाणी मिळाले परंतु शेतकऱ्यांचे उत्पन्न कसे वाढवायचे? असा प्रश्न होता. तेंव्हा आम्ही शेतकऱ्यांना रेशीम शेती आणि फळबाग लागवडीसाठी प्रवृत्त केले. शेतीतील खर्च कमी करून जास्त उत्पन्न कसे मिळेल यासाठीचे तंत्रज्ञान आम्ही शेतकऱ्यांना दिले. टाटा सामाजिक संस्थेने या कामाचा सर्व्हे केल्यानंतर ग्लोबल विकास ट्रस्टने केलेल्या कामामुळे मोठा बदल होऊन त्यांचे उत्पन्न कित्येक पटीने वाढल्याचा निष्कर्ष काढला. शेतकऱ्यांचे हजारांचे उत्पन्न आम्हाला लाखांत करायचे असल्याचेही त्यांनी या कार्यक्रमात बोलतांना सांगितले.

**कृषिकुल परिसराची पाहणी व अवलोकन**

कृषिकुल संवाद माध्यम प्रतिनिधींशी कार्यक्रमास संबंध बीड जिल्ह्यातून पत्रकार बांधवांची उपस्थिती होती. या कार्यक्रमास उपस्थितांनी कृषिकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्रात उपलब्ध सर्व सुविधांची पाहणी केली. ज्यामध्ये पाणलोट व्यवस्थापन कक्ष, माती परीक्षण प्रयोगशाळा, पिक संरक्षण कक्ष, शेती अवजार कक्ष, सेंद्रिय निविष्ठा कक्ष, गोशाळा, कंपोष्ट खत विभाग, बायोगॅस विभाग, स्वयंचलित सिंचन प्रणाली, हवामान मापक प्रणाली आदींची पाहणी करून अवलोकन केले.

------

## पशुपालकात भीतीचे वातावरण

राज्यात ३५ जिल्ह्यांमध्ये तीन लाख ५४ हजार पशूंना संसर्ग झाला होता. त्यापैकी दोन लाख ७१ हजार पशू उपचाराने बरे झाले . मात्र २५ हजार ६७६ पशूंचा मृत्यू झाला आहे. नुकसान भरपाईपोटी जनावरांच्या मालकांना ३० कोटी रुपयांची रक्कम देण्यात आली आहे. एक कोटी ४० लाख पशूंचे मोफत लसीकरण करण्यात आल्याची माहिती राज्य शासनाच्या वतीने देण्यात आली.महाराष्ट्रात ‘लम्पी’ चर्मरोग झालेल्या जनावरांचे लसीकरण करण्यात आले आहे. लसीकरण झालेल्या जनावरांना पुन्हा या चर्मरोगाची लागण होण्याचे प्रमाण कमी आहे. नव्याने ज्या केसेस समोर येत आहेत अशी जनावरांत या चर्मरोगाची लागण प्रथमच झालेली दिसून येते. त्यांच्यावर लसीकरण केल्याने चांगला फरक पडत चालला आहे. योग्य प्रकारे लसीकरण, उपचार केले तर निश्चितपणे फरक दिसून येईल, असे कोल्हापूर जिल्हा परिषदेचे पशुवैद्यक अधिकारी डॉ. प्रमोद बाबर यांनी सांगितले.पुणे जिल्ह्यातील खोडद (ता. जुन्नर) येथील २३, सातारा जिल्ह्यात ५२, तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात ७० पशुधनांना बाधा झाल्याचे समोर आले आहे. परभणी जिल्ह्यातील वझूर गावातील (ता. पूर्णा) पशुवैद्यकीय दवाखानाअंतर्गत वझूर, दगडवाडी, इटलापूर येथील पशुधनांना ‘लम्पी’चा प्रादुर्भाव झाला असल्याचे समोर आले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात लम्पी स्कीन सदृश आजाराचा ७० हून अधिक जनावरांना प्रादुर्भाव झाला आहे. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात पाच ते सहा जनावरांमध्ये ही लक्षणे दिसून आली आहेत. आतापर्यंत पशुसंवर्धन विभागाच्या आकडेवारीनुसार सत्तरच्या जवळपास जनावरांना प्रादुर्भाव झाला होता.नागपूर विभागातील नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, वगळता गोंदिया जिल्ह्यांत एखादे जनावर प्रादुर्भावग्रस्त आढळून येते. अमरावती विभागातील अकोला, वाशीम, बुलडाणा, अमरावती, यवतमाळ या पाचही जिल्ह्यांत प्रादुर्भावग्रस्त जनावरे नसल्याचा दावा पशुसंवर्धन विभागाने केला आहे. गोंदिया जिल्ह्यात दे प्रादुर्भावग्रस्त पशुधन आढळून येत आहेत.

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५




# आ. प्रकाशदादा मोगरा ते पारगाव रस्त्याकडे जरा डोळे उघडून बघा

## शेतकरी व जनावरे भोगत आहेत मरणयातना, तात्काळ दुरूस्तीची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोगरा ते सिमरी पारगाव हा साधारण ६ किलोमिटरचा रस्ता आहे. या रस्त्यावर शंभर प्रतिशत शेतकरी, महिला, मजुर, जनावरे यांची ये - जाण्याची वर्दळ आहे. या रस्त्यावर डाके पिंपरी, मोगरा, सिमरी पारगाव व नउ तंडे ये - जा करतात. मागील अनेक वर्षांपासुन या रस्त्याची दयनीय अवस्था आहे. शेतकरी, जनावरे मरण यातना भोगत आहेत. आमदार महोदयांनी आपण मायबाप सरकार म्हणुन या रस्त्याकडे उघड्या डोळ्याने पहावे आणि आम्हाला मरणयातनेतुन मुक्त करावे हा रस्ता तात्काळ मजबुतीकरण करावे अशी मागणी या परिसरातील शेतकरी करत आहेत.

तालुक्यातील मोगरा या गावापासुन लक्ष्मी आईच्या मंदिरापासुन ते पवारवाडी ते पोहनेर या जाणा-या रस्त्याला जोडणारा व या रस्त्यापासुन सिमरी पारगावकडे जाणारा हा प्रमुख रस्ता अनेक शेतक-यांच्या दररोज



उपयोगाला येणारा आहे. या रस्त्यापासुन दररोज शेकडो शेतकरी, शेतमजुर, जनावरे ये - जा करतात. मोगरा गावापासुन ते जोडरस्त्यापर्यंत यापूर्वी जिल्हा परिषदेमार्फत हा रस्ता थातुर - मातुर करण्यात आला होता. त्याची बीले गुत्तेदाराने उचलली. मात्र एक वर्षात या रस्त्याचे दिवाळे निघाले. यानंतर पुन्हा या रस्त्याचे आज बेहाल झाले आहेत. मोगरा गावापासुन ते कॅनॉलपर्यंत हा रस्ता तात्काळ दुरूस्त करावा, पायी जाणे शेतक-यांना मुश्किल झाले असुन मरणयातना जनावरे व माणसे भोगत आहेत. मागील अनेक वर्षांपासुन हा त्रास आम्ही शेतकरी सहन करत आहोत. गावच्या पुढा-यांना सांगुन आम्ही थक्लो आहोत. त्यामुळे मायबाप आमदार महोदयांनी स्वतः जातीने लक्ष देउन संबंधित खात्याला आदेशित करून, अभियंत्यांना पाठवुन या रस्त्यावरील असणारे पुल व हा रस्ता तात्काळ मंजुर करून दिपावळीपर्यंत म्हणजेच पुढच्या पावसाळ्यासाठी किमान मजबुतीकरण, खडीकरण तरी करून द्यावे अशी मागणी या परिसरातील शेतकरी भागवत डाके यांचेसह अन्य शेतक-यांनी केली आहे.

# प्रशासकीय इमारत येथे ध्वजारोहणाचा कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात विविध ठिकाणी ध्वजारोहण केले जाणार असून प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे ध्वजारोहणाचा कार्यक्रम अप्पर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक बीड, यांच्या हस्ते यांच्या सकाळी ८.३० वाजता होणार आहे. हा ध्वजारोहण समारंभ संपल्यानंतर अधिकारी व कर्मचारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभास सकाळी ८.४५ पूर्वी शासकीय गणवेषात उपस्थित रहावे. असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.



# मोठेवाडीत चेअरमन कॉ.सुभाष डाके यांचा नागरी सत्कार

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथे चेअरमन कॉ.सुभाष डाके यांचा ग्रामपंचायत प्रांगणात सर्व ग्रामस्थांच्या वतीने सपत्नीक नागरी सत्कार दि १४ ऑगस्ट गुरूवार रोजी करण्यात आला.

पंधरा ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने दिल्ली येथील लाल किल्ल्यावर ध्वजारोहण कार्यक्रमासाठी सहकार क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल मराठवाड्यातील एकमेव नित्रुड सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन कॉ.सुभाष डाके यांची निवड झाली.या निवडी बद्दल चेअरमन कॉ.सुभाष डाके यांचा मोठेवाडी ग्रामस्थांच्या वतीने सपत्नीक नागरी सत्कार करण्यात आला.

पान ६ वरुन...

## रुग्णांसाठी देवासारखा धावून

निधीचे प्रमुख होते .आता ते केंद्रामध्ये पंतप्रधान आरोग्य सहाय्यता निधीचे प्रमुख आहेत. राज्याकडून तर मदत मिळतेच मिळते, परंतु आता केंद्राकडूनही रुग्णांसाठी मदत मिळणे सोपे झाले आहे. आपला हक्काचा माणूस त्या ठिकाणी असल्याने महाराष्ट्रासाठी आणि विशेषता बीड जिल्ह्यासाठी हे काम अत्यंत सोपे झाले आहे. बीड जिल्ह्यातला कुठलाही रुग्ण असो त्याला योग्य ठिकाणी उपचार मिळावेत याही पुढे जाऊन त्याच्या नातेवाईकांची सोय व्हावी याची व्यवस्था ओमप्रकाश शेटे करतात. बीड जिल्हा हा तर त्यांच्यासाठी जिव्हाळ्याचा विषय, विशेषतः माजलगाव तालुक्यातील बहुतांश लोकांना ते थेट ओळखतात. त्यामुळे त्यांच्यासाठी उपचार मिळवून देणेहे काम ते तत्परतेने करतात. प्रत्येकाला आपला वाटणारा हा माणूस अडचणीच्या काळी देवासारखाच वाटतो. आपल्या समाजाला सर्वात जास्त गरज असते ती आरोग्य सुविधा आणि त्या वेळेवर न मिळाल्यामुळे अनेकांना प्राण गमवावे लागतात. पैसा हा मोठी समस्या आहे यासाठी ते मदत करतात. एखाद्या प्रकरणांमध्ये खर्च मोठा असेल तर ते त्याची व्यवस्था करतात. त्यांच्याकडे आलेला कोणीही रुग्ण आणि त्यांचा नातेवाईक निराश होत नाही. विशेष म्हणजे नातेवाईकांना ज्या ठिकाणी उपचार घेणे सोयीचे असेल त्या ठिकाणी त्यांची व्यवस्था करतात. ही सामाजिक बांधिलकी जपणे एवढी सोपी गोष्ट नाही. प्रत्येकाची मने सांभाळणे अवघड गोष्ट आहे. हे सर्व करत असताना त्यांनी आरोग्य दूत म्हणून अनेक मुले तयार केली आहेत. महाराष्ट्रभरात ही मुले रुग्णांसाठी मदत करतात. त्यासाठी एक खात्रीची टीम त्यांना उभी करायची आहे. आगामी काळात जवळपास ५००० मुलं या कामासाठी तयार करण्याचा त्यांचा मानस आहे. असे झाले तर महाराष्ट्रभर आरोग्य विभागाचे नेटवर्क तयार होऊन गोरब गरिबांना अगदी सुलभतेने उपचार मिळणार आहेत. कारण मदतीसाठी कोणाला भेटावे काय करावे याबाबत अनेकांना माहिती नसते. अशा लोकांसाठी ही मुलं त्यांना त्यांच्या गावातच मदत करतील .अशी व्यवस्था करण्याचा मानस व्यक्त केला. प्रत्येकाला वेळेवर धावून जाणारा माणूस हा देवदुतच वाटतो म्हणूनच ओमप्रकाश शेटे देवासारखे धावून येतात असे अनेक रुग्ण आणि नातेवाईक बोलतात. ज्यावेळी ते गावाकडे असतात त्यावेळी त्यांच्या घरी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक मोठ्या प्रमाणात गर्दी करतात प्रत्येकाला उपचार मिळावेत यासाठी त्यांची धडपड असते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत ते यासाठी वेळ देतात जिल्ह्यातील प्रत्येक माणसाला उपचार मिळावे यासाठी त्यांचा प्रयत्न असतो.

## सकाळी निवेदन दिले

घेऊन १५ मिनिंटे लोटांगण घेत निषेध व्यक्त करणार असल्याचे निवेदन १२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता दिले आणि चमत्कार झाला. निवेदन सकाळी ११ वाजता दिले आणि काम दुपारी ३ वाजता करून दिले. इतक्या दिवसांपासून जो प्रश्न मार्गी लावण्यासाठी अभियंता व संबंधित कर्मचाऱ्यांना विनंती करण्यात येत होती. वृत्तपत्रातून याप्रकरणी बातम्या छापून आल्या होत्या तर दखल घेतली असे दाखवत ग्रेडर वाहनने चिखल पाणी हटवत थातूरमातूर काम करून वेळ काढूपणा काम केले होते. परंतु एका निवेदनाद्वारे सकाळी विनंती केली आणि त्या निवेदनाची दखल घेत दुपारी प्रश्न मार्गी लावला म्हणून सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार रहेमान सय्यद यांनी निवेदन दिलेल्या सर्व अधिकाऱ्यांना निवेदनाची दखल घेऊन काम करून दिले प्रश्न मार्गी लावला म्हणून १५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी होणाऱ्या निषेध लोटांगणला स्थगिती देत असल्याचे लेखी कळविले आहे.

## नशेखोरीपासून युवापिढीला

नशा ही समाजाच्या मुळावर घाव घालणारी गंभीर समस्या असल्याचे सांगत, ''नशा सोडा, जीवन जोडा'' आणि ''नशा नाही, संस्कार हवे'' अशा संदेशांद्वारे व्यसनमुक्तीचा निर्धार व्यक्त केला आहे. सुरक्षित, नशामुक्त आणि उज्ज्वल अंबाजोगाईसाठी पोलिसांनी नागरिकांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

नशा ही भविष्य उध्वस्त करणारी साखळी

''नशा ही फक्त वाईट सवय नसून ती आरोग्य, शिक्षण आणि भवितव्य उद्ध्वस्त करणारी साखळी आहे. प्रत्येक पालकाने आपल्या मुलांचे योग्य मार्गदर्शन करून, संशयास्पद हालचाली पोलिसांना कळवून या सामाजिक लढ्यात हातभार लावावा'', असे आवाहन पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे आणि अंबाजोगाईत शहर ठाण्याचे पोलीस निरिक्षक शरद जोगदंड यांनी केले आहे.

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-२०१ दिनांक-११/०८/२०२५

### जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती अंजली किरण भोरे रा.बोरी ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत: जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अंजली किरण भोरे | स्वत: | ०२/०५/२००४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तडजोडीआधारे १७ प्रकरणे निकाली काढली तर १९ प्रकरणे न्याय प्रविष्ट आहेत. यात नवीन रस्ते व रस्ता मोकळा केलेली संख्या समाविष्ट आहे. सातबारा व इतर अधिकारात नोंद घेण्यासाठी मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी यांना २१ आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती परतुरचे तहसीलदार डॉ.प्रतिभा गोरे यांनी दिली आहे

### जाहीर प्रगटन

**मा.श्रीमती. एस. डी. सोनी, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १२८७/२०२५**

**सुंदराबाई अर्जुन सानप व ईतर विरूध्द निरंक**

अर्जदार १. श्रीमती सुंदराबाई पि. अर्जुन सानप, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. सानपवाडी, ता. जि. बीड, २. जयराम पि. रामभाउ सानप, वय ३९ वर्षे, धंदा शेती, रा. सानपवाडी, ता. जि. बीड., ३. विक्रम पि. रामभाऊ सानप, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. सानपवाडी, ता. जि. बीड., ४. संतोष पि. रामभाउ सानप, वय २८ वर्षे, धंदा शेती, रा. सानपवाडी, ता. जि. बीड.

विरुध्द निरंक

मागणी बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत रामभाऊ अर्जुन सानप, यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत रामभाऊ अर्जुन सानप, यांचा मृत्यु दिनांक १६/०६/२०२४ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत रामभाऊ अर्जुन सानप, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी. सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत रामभाऊ अर्जुन सानप, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक १४/०८/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.**

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १५/०९/२०२५ आहे.**

आदेशावरून

स्वाक्षरीत | स्वाक्षरीत

**क. लिपिक** | **अधीक्षक**

दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जिल्ह्यातील पहिले अवयव संकलन केंद्र संजीवनी हॉस्पिटल येथे




जालना। प्रतिनिधी

संजीवनी हॉस्पिटल येथे जागतिक अवयव दान दिनानिमित्त ''अवयव संकलन केंद्र''चे उद्घाटन संजीवनी हॉस्पिटल जालना येथे करण्यात आले. जागतिक अवयव दान दिनाचे औचित्य साधून संजीवनी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल येथे जिल्ह्यातील पहिल्या ऑर्गन रिट्रीव्हल सेंटरचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. या केंद्रासाठी मिळालेली अधिकृत मान्यता ही जालनावासीयांसाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या निमित्ताने दि. फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशनच्या सहकार्याने छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून संजीवनी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलपर्यंत जनजागृती बाईक रॅली काढण्यात आली. रॅलीच्या सुरुवातीला ज्ञान संजीवनी फाऊंडेशनच्या विद्यार्थ्यांनी अवयव दानाविषयी प्रभावी पथनाट्य सादर करून जनजागृती केली.

उद्घाटन प्रसंगी मा. श्री. माजी मंत्री तथा आमदार बाबनरावजी लोणीकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आली या प्रसंगी जालना जिल्ह्यातील पहिल्या हृदय प्रत्यारोपण प्राप्तकर्त्या धनिश्री मुजमुळे ह्या विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या.या वेळी मा. माजी मंत्री राजेशभैय्या टोपे, माजी आ. कैलासजी गोरंट्याल, माजी आ. अरविंदजी चव्हाण, मा. श्री. भास्कर आबा दानवे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, सुनीलभाई रायतट्टा तसेच कमलनयन बजाज रुग्णालयातील डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस, डॉ. अजय रोट्टे, डॉ. मिलिंद वैष्णव, डॉ. प्रविण सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात श्री. साईनाथ पवार, श्री. भांदरगे जीजा, श्री. शिवादादा शेजूळ, श्री. कृष्णा पाडोल, सौ. सीताबाई मोहिते यांची विशेष उपस्थिती होती. सूत्रसंचालन दिलीप देवडे यांनी केले. या उपक्रमासाठी विशेष सहकार्य करणारे दि. फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशनचे सदस्य डॉ. सतीश कसाट, धनंजय पांगर्कर, मुकुंद काळे, कृष्णा मुजमुळे यांच्यासह संजीवनी हॉस्पिटलच्या वतीने डॉ. बाळिराम बागल, डॉ. शिवदास मिरकड, डॉ. राजगुरू, डॉ. गोयल, डॉ. पॉल, सौ. हर्षदा बागल ,अमोल कदम, गजानन गजमल, कैलास म्हस्के उपस्थित होते.

## वाळू माफियांचा तहसीलदारांवर हल्ला

जालना। प्रतिनिधी

मंठा तहसीलदार यांच्यावर वाळ माफियांनी रात्री दोन वाजता शिवीगाळ करत जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी व शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी मंठा पोलिसात तहसीलदार कल्याण काळदाते यांच्या फिर्यादी वरून साबेर सिकंदर पठाण, अबरार लकीब सय्यद, शेख शफिक नजीर या तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस सूत्रांकडून मिळाली माहिती अशी की, रात्री वाळू माफिया विना क्रमांकाच्या पिकअप वाहनामध्ये अवैधरीत्या रीती वाळू उपसा करून विनापरवाना बेकायदेशीररित्या वाळूची चोरटी वाहतूक करत होते. तहसीलदार यांना मिळालेल्या माहितीनुसार, त्यांनी सदर वाहनास थांबवून तपासणी

करून विचारणा केली असता. वाळू माफियांनी ५० ते १०० जण बोलवून तहसीलदार यांच्यावर हल्ला केला त्यांच्या गाडीमागे व पुढे वाहने पळवत तहसीलदार काळदाते यांना धक्काबुक्की करून शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी देऊन वाळुने भरलेला पिकअप पसार केला. याप्रकरणी मंठा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक मनोजकुमार राठोड हे करत आहेत.दरम्यान मंठा शहरात व परिसरात वाळू माफीयाची मुजोरी वाढली असून रात्री उशिरा व सकाळी अवैध वाळची राजरोसपणे चोरी केली जात आहे. आता तर तहसीलदार हल्ला करण्यापर्यंतची मुजोरी वाळू माफियांची वाढली असल्यान परिसरातील नागरिकात भीतीचे वातावरण पसरले आहे.

# जिल्ह्यात 3 ठिकाणी जुगार अड्ड्यावर छापे

## स्थानिक गुन्हे शाखेने केला लाखो रुपयांचा मुद्देमाल हस्तगत,२३ अटकेत

बीड । प्रतिनिधी

**पोलीस अधीक्षक नवनीत का व त्यांच्या सूचनेवरून बीड जिल्ह्यामध्ये तीन ठिकाणी जुगार अड्ड्यावर धाडी टाकून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २३ जुगार यांना ताब्यात घेतले. याबरोबरच जवळपास ११ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.**





पोलीस अधीक्षकांनी जिल्ह्यामध्ये चालणाऱ्या अवैध धंदयाची माहीती काढुन कारवाई करण्याचे आदेशित केल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका दिवसात तीन जुगार अड्डावर छापा मारुन कारवारई केली असुन त्यामध्ये पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने याचे पथकाने पोलीस ठाणे केज हद्दीत नांदुरघाट येथे दिक्षा किराणा च्या मागे चालणाऱ्या तिरट नावाचा जुगारावर छापा मारुन आरोपी १. बबलु सत्तार शेख, वय ३१ वर्ष, रा नांदुरघाट, २. अविनाश तुकाराम लोंढे, वय ३० वर्ष, ३. नवनाथ निवृत्ती मगरे, वय ३८ वर्ष, ४. बबन एकनाथ गायकवाड, वय ७० वर्ष, ५. आकाश बापु शिंदे, वय २३ वर्ष, ६. सुशिल शिवाजी त्रिमुखे, वय ४३ वर्ष, ७. प्रकाश गेणबा जाधव, वय ४० वर्ष, ८. चंदु दशरथ जाधव, वय ३० वर्ष, ९. ऋषिकेश भिमा गायकवाड, वय २२ वर्ष, सर्व रा नांदुरघाट व १०. विनोद देविदास हांगे, वय ३१ वर्ष, रा हांगेवाडी, ता. केज यांना पकडुन त्याचे ताब्यातुन तिरट जुगाराचे साहीत्य, नगदी, मोबाईल, मोटार सायकल असा एकुण २,६३,०६० मुद्देमाल हस्तगत करुन त्याचे विरुधद पोलीस ठाणे केज गु.र. नं ४३७/२०२५ कलम १२ (अ) मु.जु. का प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे, तसेच त्याच पथकाने पोलीस ठाणे दिंद्रुड हद्दीत तेलगांव ते परळी रोडलगत ईसार पेट्रोलपंपाचे मागे तिरट जुगार खेळणाऱ्या आरोपी १. दत्ता मधुकर लगड, वय ४२ वर्ष, २. अक्षय सुरेश लगड, वय २८ वर्ष, ३. सचिन नारायण कटारे, वय ४५ वर्ष, ४. पोपट प्रकाश सोनवणे, वय ३३ वर्ष, ५. बळीराम नामदेव तिडके, वय ४५ वर्ष, ६. अंकुश लक्ष्मण लगड, वय ४५ वर्ष सव रा तेलगांव याना पकडुन त्याचे ताब्यातुन नगदी, जुगाराचे साहीत्य, मोटार सायकल मोबाईल असा एकुण २,१२,७०० रु मुद्देमाल जप्त करुन त्याचे विरध्द पोलीस ठाणे दिंद्रुड गु.र.नं २१२/२०२५ कलम १२ (अ) मुजुका प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे.

तसेच पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर याचे पथकाने पोलीस ठाणे पेठ बीड येथील नागोबा गल्ली येथे तिरट नावाचा जुगार चालणाऱ्या अड्ड्यावर छापा मारुन आरोपी १. अब्दुल फईल जलीम मोमीन, वय ४८ वर्ष, २. कृष्णा अशोक परळकर, वय २३ वर्ष, ३. वैभव पांडुरंग तांगडे, वय २५ वर्ष, ४. अमित शरद जोगदंड, वय २१ वर्ष, ५. अकबर मुसा खॉन, वय ३९ वर्ष, ६. राजु रवी क्षीरसागर, वय ३२ वर्ष, ७. संकेत चंद्रकांत तांगडे, वय २८ वर्ष, ८. शेख अमेर शेख अन्सार, वय २८ वर्ष, सर्व रा बीड यांना पकडुन त्याचे ताब्यातुन दुचाकी, मोबाईल, नगदी असा एकुण ६,३५,५७० रू मुद्देमाल हस्तगत करुन त्याचे विरुधद पोलीस ठाणे पेठ बीड गु.र.नं २२८/२०२५ कलम ४,५ मु.जु.का प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे सदरील कामगिरी नवनित कॉंवत, पोलीस अधीक्षक, बीड, सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार, महेश जोगदंड, आनंद म्हस्के, विकास राठोड, सोमनाथ गायकवाड, बाळु सानप, बप्पासाहेब घोडके, अर्जुन यादव, आशपाक सय्य्द, मनोज परजणे, चालक नितीन वडमारे, सुनिल राठोड, गणेश मराडे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.

## बीड शहरात भाजपाची तिरंगा यात्रा

बीड । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी प्रदेश सूचनेनुसार संपूर्ण राज्यभर तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.यानिमित्ताने लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे माजी खा. डॉ. प्रीतमताई मुंडे, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, यांच्या मार्गदर्शनाखाली व मंडळ अध्यक्ष अशोक लोढा, तिरंगा यात्रा जिल्हा संयोजक शांतिनाथ डोरले यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत तिरंगा यात्रा संपन्न झाली.



यावेळी विक्रांत हजारी,चंद्रकांत फड, अजय सवाई, अनिल चांदणे, विलास बामणे, अशोक रसाळ, राहुल दुबाले, मीराताई गांधले,संध्याताई राजपूत, प्रीतताई कुकडे, शैलजाताई मुसळे, दादासाहेब ननवरे, ओमप्रकाश गिरी, बालाजी पवार, राजू शहाणे, अमोल वडतीले, भालचंद्र कुलकर्णी, विठ्ठल घोडके, सलीम आतार, बाबूलाल ढोरमारे,संतोष गवळी, आप्पासाहेब झोडगे, अंकुश गोरे, देशमुख ताई, सुरेश पवार,विष्णु महाराज सुरवसे, वाघमारे उपाध्यक्ष, नेहा माळी, चौधरी सर, गणेश लांडे, ज्ञानेश्वर उडाले, प्रशांत डोरले, केशव बडे, काकासाहेब कानडे यांच्यासह शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

## सकाळी निवेदन दिले दुपारी प्रश्न लागला मार्गी

### १५ ऑगस्ट रोजी करण्यात येणाऱ्या निषेध लोटांगणला स्थगिती -रहेमान सय्यद

**दै.राज्य लोकतंत्रच्या बातमीचा दणका**

आष्टी । प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील साबलखेड कडा आष्टी रस्त्यांचे काम दोन वर्षांपासून चालू असून या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी गटारी बनवतांना गटारीला पावसाचे पाणी जाण्यासाठी जागोजागी चार-चार इंचाची छिद्रे ठेवली होती.परंतु रस्ता बनवतांना ते सगळेच्या सगळे छिद्रे रस्त्यात बुजून टाकली. परिणामी दावलमलिक (शादवल) दर्गा समोर ५० फुटापेक्षा जास्त लांबीचे व २० फुटाच्या आसपास रूंदीत पावसामुळे कायमच चिखल - पाण्याचे ढव साचून राहत होते.त्यामुळे ये-जा करतांना कसरत करावी लागत होती.तर घसरून पडण्याची भिती, अपघाताची भिती



यावर उपाययोजना करावी म्हणून सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार रहेमान सय्यद यांनी वेळोवेळी अभियंता भोपळे सह संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांना फोटो व्हिडिओ पाठवून संपर्क करून यावर लवकर उपाययोजना करावी म्हणून विनंत्या केल्या होत्या परंतु दखल घेतली नाही. म्हणून १२ ऑगस्ट २०२५ रोजी लेखी निवेदन देऊन आजपर्यंत दखल घेतली नाही याचा निषेध म्हणून १५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी सकाळी ११:३० वाजता दर्गा समोर साचलेल्या चिखल-पाण्यात भोपळा,बेशरम

◀◀ पान ३ वर

## पांडुरग कुलकर्णी यांचे निधन

गेवराई । प्रतिनिधी



येथील राज्य परिवहन मार्ग महामंडळातील गेवराई आगारात गेली अनेक वर्षे नियंत्रक म्हणून काम करीत असलेले सुपरिचित सेवानिवृत्त नियंत्रक पांडुरंग विठ्ठलराव कुलकर्णी (सुर्डीकर ) यांचे वृद्धापकाळाने दिनांक १४ ऑगस्ट रोजी सकाळी निधन झाले . मृत्यूसमयी त्यांचे वय ८२ वर्षे होते .त्यांच्या पश्चात पत्नी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुख्याध्यापक विशाल कुलकर्णी (सुर्डीकर ) व विवाहित मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे . रंगार चौक मारोती मंदिरासमोर ते पूर्वी राहात होते . सध्या ते ताकडगाव रोडवर मुलाबरोबर राहात होते . पांडुरंग कुलकर्णी हे गेवराई आगारामध्ये तात्या म्हणून प्रसिद्ध होते . त्यांच्या निधनाचे वृत्त कळताच गेवराई पंचक्रोशीत हळहळ व्यक्त केली जात आहे.

## स्वातंत्र्य दिनानिमित्त पोलीस अधीक्षक बजरंग बनसोडे यांना रौप्यपदक जाहीर

आष्टी । प्रतिनिधी



सध्या मुंबई येथे पोलीस उपायुक्त पदी नियुक्तीवर असलेले आष्टी तालुक्याचे भूमिपुत्र बजरंग आनंदराव बनसोडे यांना विशेष तपास यंत्रणा महासंचालक यांचे कडून विशेष कामगिरीबद्दल रौप्य पदक जाहीर करण्यात आले आहे..

याविषयीचे सविस्तर वृत्त असे की, १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिना निमित्त..भारत सरकार गृह मंत्रालय अंतर्गत..() राष्ट्रीय तपास यंत्रणा यांचे महासंचालक यांचे कडून बजरंग बनसोडे हे मुंबई येथे राष्ट्रीय तपास यंत्रणा अंतर्गत.. पोलीस अधीक्षक पदी कार्यरत असताना मागील वर्षी केलेल्या विशेष कामगिरीबद्दल रौप्यपदक देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला आहे..याच आदेशामध्ये..महाराष्ट्र राज्यातील.. मुंबई येथील शशिकांत आर.सिंग पोलीस निरीक्षक यांना सुवर्णपदक आणि दीपक रंगराव म्हस्के, पोलिस निरीक्षक यांना रौप्यपदक जाहीर करण्यात आले आहे..

## नशेखोरीपासून युवापिढीला दूर ठेवण्यासाठी पोलिसांची मोहीम

### मुलाची संगत, दैनंदिनी हालचालींवर लक्ष ठेवण्याचे पालकांना आवाहन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सध्या युवांमध्ये ड्रग्जचे प्रमाण वेगाने वाढत आहे. लगतच्या जिल्ह्यातील अनेक तरुण व्यसनाधीन झाल्याचे मागील काही घटनांतून उघड आले आहे. शिक्षणाचे प्रमुख केंद्र असलेल्या अंबाजोगाईत याचे लोण पोहोचू नये यासाठी शहर पोलिसांनी नशाविरोधी जनजागृती मोहीम राबवून पालक आणि नागरिकांना आपल्या परिसरात वाढत्या व्यसनाधीनतेबाबत सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. समाजाच्या भविष्यासाठी घातक ठरणाऱ्या



नशेमुक्तीच्या लढ्यात प्रत्येकाने सक्रिय सहभाग घ्यावा, असे पोलिसांनी सांगितले.

पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या मोहिमेत पालकांना आपल्या मुलांच्या दैनंदिन हालचालींवर लक्ष ठेवण्याचे, त्यांच्या वागणुकीतील बदल ओळखण्याचे आणि संशयास्पद हालचाली त्वरित पोलिसांना कळवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शाळेत जाण्या-येण्याच्या वेळा, संगत, बॅगची तपासणी, पैशांची अनावश्यक मागणी, उशिरा घरी परतणे, कपड्यांवर किंवा अंगावर येणारा वास, अभ्यासात किंवा शाळा-क्लासेसला जाण्यात आलेली ढिलाई ही नशेची लक्षणे असू शकतात, याची जाणीव करून देण्यात आली. मुलांचा वेळ कोणासोबत जातो आणि कुठे घालवला जातो, तसेच परिसरात कोणी नशेचे पदार्थ विक्री करत आहे का, याची माहिती गोपनीयतेने पोलिसांना द्यावी, असेही आवाहन करण्यात आले. शाळा, कॉलेज, क्लासेस किंवा सार्वजनिक ठिकाणी नशेची विक्री किंवा सेवन होत असल्याचे दिसल्यास त्वरित पोलीस नियंत्रण कक्ष किंवा अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे सांगण्यात आले. पोलिसांनी

◀◀ पान ३ वर



मुंबई येथे लोकनेत्या मा. पंकजाताई मुंडे यांना भेटून तैलचित्र भेट देताना भाजपा युवा नेते सुरज रामकृष्ण घुले

## युसूफवडगाव पोलीस स्टेशनमध्ये शांतता समितीची बैठक

युसूफवडगांव । प्रतिनिधी केज तालुक्यातील युसूफवडगांव पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सर्व गावामधील नागरिकांची आगामी येणाऱ्या सणांच्या अनुषंगाने पोलीस स्टेशनमध्ये शांतता समितीची बैठक संपन्न झाली.

आज युसूफवडगांव पोलीस स्टेशनमध्ये पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या ६० गावामधील नागरिकांची शांतता कमिटीची बैठक घेण्यात आली यावेळी उपस्थितांना युसूफवडगांव पोलीस स्टेशनचे प्रभारी सपोनि.मच्छिंद्रनाथ शेंडगे यांनी उपस्थितांना सविस्तर अशी माहिती देऊन मार्गदर्शन केले




यावेळी त्यांनी आगामी येणारा काळ सणांचा असुन त्यामध्ये विविध सण येत असुन त्या अनुषंगाने त्यांनी सर्व गणेश भक्तांना गटतट विसरून एक गाव एक गणपती बसवुन आप आपसातले मतभेद दुर करावे त्यामुळे गावामध्ये एकोपा वाढेल,गणेश व गणेश विसर्जन मिरवणुकीत डिजे ऐवजी पारंपारिक वाद्यांचा सहभाग करावा तसेच जे कोणी डिजे लावुन ध्वनी प्रदूषण करतील त्यांच्या योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल विसर्जन मिरवणुकीत कोणी दारू पिऊन गोंधळ घालणार याची दक्षता गणेश मंडळांनी घ्यावी.समाजात तेढ निर्माण होणार नाही असे देखावे व गाणी वाजणार नाही काळजी घ्यावी.तसेच सर्व गणेश भक्तांना आप आपल्या गणेश मंडळांच्या वतीने समाजोपयोगी कार्य,समाज प्रबोधन करणारे देखावे व कार्यक्रम गावा गावात सादर करून समाज जनजागृती करावी असे आवाहन त्यांनी केले.यावेळी विविध गावातील सरपंच,पोलीस पाटील,गणेश मंडळाचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाटोदा महावितरणकडून सौर कृषी पंपासाठी शेतकऱ्यांची पिळवणूक; पालकमंत्री गंभीर विषयाकडे लक्ष देणार का?

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांना सौर कृषी पंप योजना वरदान ठरण्याऐवजी शाप ठरत आहे. शासनाने ९५ टक्के अनुदान देऊन शेतकऱ्यांना मोफत सूर्यऊर्जेवर चालणारे पंप देण्याची ग्वाही दिली होती, मात्र महावितरणच्या ढिसाळ आणि विलंबशीर कारभारामुळे या योजनेत पिळवणूक सुरू आहे. महिने महिने अर्ज प्रलंबित, 'फाईल'

पाटोदा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांचे अर्ज पूर्ण कागदपत्रांसह महावितरण कार्यालयात पडून आहेत. काहींना अर्ज भरून काही महिने उलटले तरी पंप मंजुरी मिळालेली नाही.यामुळे कोरडवाहू पाटोदा तालुक्यात पाण्याची टंचाई ही जुनी समस्या आहे. विजेवर चालणारे




पंप वेळेवर वीज न मिळाल्याने निरुपयोगी ठरत असताना, सौर पंप हा एकमेव दिलासा ठरू शकतो, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती. पण अर्ज मंजुरीतला विलंब होत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा चिरडल्या जात आहेत. शेतकरी सांगतात, ''अर्जाला आठ महिने झाले. कागदपत्रे पूर्ण आहेत. तरीही पंप मंजूर होत नाही. महावितरणचे अधिकारी फाईल पुढे करण्यासाठी टाळाटाळ करतात.यामुळे शेतकरी संघटनांनी थेट इशारा दिला आहे की, ''महावितरणने भ्रष्टाचार तात्काळ थांबवून सर्व प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत. अन्यथा पाटोदा महावितरण कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल बीड जिल्हाचे पालकमंत्री अजित पवार झाल्याने पालकमंत्र्यांकडे आशेने पाहणारे शेतकरी १५ ऑगस्टच्या झेंडावंदन रोजी पालकमंत्री अजित पवार ह्या गंभीर प्रकरणाकडे लक्ष देतील का, हा प्रश्न आता पाटोदा तालुक्यातील प्रत्येक शेतकऱ्याच्या मनात आहे. शेतकऱ्यांच्या समस्या थेट त्यांच्या पर्यंत पोहोचत नसल्याने दादा ठोस निर्णय घेत नाहीत मात्र १५ ऑगस्टला पालकमंत्री अजित दादा पवार झेंडावंदन करण्यासाठी येणार असल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.

## रुग्णांसाठी देवासारखा धावून जाणारा माणूस : ओमप्रकाश शेटे

**विशाल साळुंके**

आज देशांमध्ये अनेक समस्या आहेत. सर्वात मोठी समस्या आहे गरिबी आणि या गरिबीला चिकटूनच येथे आरोग्य समस्या. राहणीमान सोयी सुविधांचा अभाव यामुळे गोरगरिबांचे आरोग्य चांगले राहिल याची खात्री नाही. विशेषतः शेतकरी समाजामध्ये आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष आर्थिक विवंचना यामुळे अनेक जणांना वेळेवर आरोग्य सुविधा मिळत नाहीत मोठे आजार असतील तर त्यासाठी खर्च करण्यासाठी पैसा नसतो. अशावेळी आपण देवाचा धावा करतो. मात्र आता आरोग्य सुविधा देण्यासाठी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी देवासारखा धावून जाणारा माणूस आपल्या





महाराष्ट्रात आहे. सुदैवाने तो आपल्या बीड जिल्ह्यात आहे. माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड सारख्या ठिकाणी राहणारे ओम प्रकाश शेटे केंद्र शासनाच्या आरोग्य विभागाचे प्रमुख प्रकाश शेटे हे रुग्णांसाठी देवासारखे धावून जातात. ग्रामीण भागात अनेक जण नेहमी म्हणत असतात अगदी देवासारखा धावून आला रुग्ण आणी त्यांच्या नातेवाईकांना आजारपणात काय करावे हे सुचत नाही. पैसा नसतो उपचार कुठे करावे हे माहीत नसतं. शिक्षणाचा अभाव असतो शेतकरी समाजात तर अनेक प्रश्न असतात. अशावेळी योग्य ठिकाणी योग्य उपचार मिळण्यासाठी ओम प्रकाश शेटे हे देवासारखे धावून येतात.

प्रसंग तसाच आहे गेल्या चार दिवसांपूर्वी ओमप्रकाश शेटे यांच्या निवासस्थानी जाण्याचा योग आला आम्ही दुपारी दोन वाजता पोहोचलो. ओम प्रकाश शेटे हे माजलगाव ला एका कार्यक्रमासाठी गेले होते. आम्ही घरी पोहोचायच्या आधीच या ठिकाणी डझनभर रुग्णांचे नातेवाईक जमा झाले होते. प्रत्येकाला काही ना काही उपचाराची गरज होती. त्यासाठी देवासारखी लोक वाट पाहत होते. ज्यावेळी कार्यक्रम आटोपून प्रकाश शेटे आले. आल्या आल्या त्यांनी चला कोणाकोणाची काय समस्या आहे ते सांगा? याची सुरुवात केली न थकता जवळपास सहा वाजेपर्यंत रुग्णांच्या समस्या त्यांच्या आर्थिक अडचणी, कोणत्या रुग्णासाठी कोठे योग्य उपचार होतील याचे करेक्ट नियोजन, या सर्व बाबी करून मुंबईसारख्या ठिकाणी ही मी तुमची व्यवस्था करतो हे म्हणण्याचे धाडस ओमप्रकाश शेटे करतात. कारण त्यांनी तेवढा जिव्हाळा निर्माण केला आहे .मुंबईसारख्या ठिकाणी आपले नेटवर्क उभे करणे सोपी गोष्ट नाही. मात्र आपल्या स्वभावाने आणि सरकारच्या मदतीने हे शक्य झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळामध्ये ते मुख्यमंत्री आरोग्य सहाय्यता

◀◀ पान ३ वर

### भावाबरोबर बोलण्यासाठी मुश्किलीने वेळ काढला

**ओम प्रकाश शेटे दुपारी अडीच वाजता आले त्यानंतर त्यांनी लगेच कामाला सुरुवात केली. या दरम्यान त्यांचे बंधू भेटण्यासाठी आले होते. त्यांच्यासाठी मुश्किलीने वेळ काढून अर्ध्या तासात चर्चा आटोपली आणि ते पुन्हा कामाला लागले. मात्र या दरम्यानही शेटे साहेब कधी बाहेर येतात आणि आपले काम करतात यासाठी रुग्ण आणि नातेवाईक तळमळत होते. प्रत्येकाला आपले काम व्हावे अशी अपेक्षा होती. जोपर्यंत सर्व लोकांच्या समस्या सुटत नाहीत तोपर्यंत ओमप्रकाश शेटे यांनी सर्वांना वेळ दिला.**

### प्रत्येकाचे समाधान

**ओम प्रकाश शेटे यांच्याकडे जेवढे लोक येतात. त्या प्रत्येक रुग्णांचे, त्यांच्या नातेवाईकांचे परिपूर्ण समाधान करूनच ते थांबतात. त्यामुळे जातांना रुग्णांच्या आणि त्यांच्या नातेवाईकांच्या चेहऱ्यावर हसू फुलते. हे समाधानच माझे भांडवल आहे असे ओमप्रकाश शेटे सांगतात.**

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# देशभक्तीचा उत्साह आणि स्वच्छतेचा संकल्प अनोखा संगम

## हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता अभियानांतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेकडून भव्य बाईक रॅलीचे आयोजन,स्वच्छतेची शपथ,झाडे लावण्याचाही सामुहिक संकल्प

**पिंपरी । प्रतिनिधी**

**'भारत माता की जय' , 'वंदे मातरम' अशा घोषणांनी दुमदुमलेला परिसर हातामध्ये अभिमानाने फडकणारा तिरंगा रस्त्यांवरून शिस्तबद्धपणे पुढे सरसावणारी भव्य बाईक रॅली देशभक्तीचा उत्साह, स्वच्छतेचा संकल्प आणि पर्यावरणप्रेमाचा संदेश यांचा एकत्रित सोहळा आज पिंपरी चिंचवडमध्ये अनुभवायला मिळाला.**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने 'हर घर तिरंगा आणि हर घर स्वच्छता' अभियानाच्या निमित्ताने आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली आज भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. भक्तीशक्ती येथून सकाळी ७ वाजता सुरू झालेली ही रॅली महापालिका मुख्यालयापर्यंत देशभक्तीच्या वातावरणात आणि प्रचंड उत्साहात पार पडली. या रॅलीत महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे, सचिन पवार, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, अंकुश झिटे, सुधीर वाघमारे, किशोर दरवडे, शांताराम





माने, महेश आढाव, श्रीराम गायकवाड, उप अग्निशमन अधिकारी गौतम इंगवले, यमुनानगर ज्येष्ठ नागरिक संघाचे गजानन ढमाले , रवींद्र कुकडे यांच्यासह विविध भागातील ज्येष्ठ नागरिक, महापालिकेच्या अग्निशमक, आरोग्य, जनसंपर्क, स्थापत्य, विद्युत तसेच विविध विभागातील कर्मचारी यांसह मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.रॅलीदरम्यान 'भारत माता की जय', 'वंदे मातरम' आणि 'स्वच्छ भारत, सुंदर भारत' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. सहभागी नागरिकांनी 'माझी वसुंधरा' व स्वच्छतेची सामूहिक प्रतिज्ञा घेऊन पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्त शहर आणि कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित केले.रॅलीत सहभागी बाईकस्वारांनी तिरंग्यांनी सजवलेल्या वाहनांसह शिस्तबद्धपणे प्रवास करत नागरिकांना देशभक्तीचा आणि जबाबदार नागरिकत्वाचा संदेश दिला. या उपक्रमातून स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला देशभक्तीबरोबरच स्वच्छतेचे आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व प्रभावीपणे जनमानसात रुजवण्यात आले. तसेच महापालिकेच्या 'हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता' या उपक्रमाचा उद्देश केवळ स्वातंत्र्य दिनाचा उत्सव साजरा करणे नसून, नागरिकांमध्ये स्वच्छतेची सवय आणि पर्यावरणपूरक जीवनशैली रुजवणे असल्याचे यावेळी आरोग्य विभाग प्रमुख उप आयुक्त सचिन पवार यांनी सांगितले तसेच या निमित्ताने शहरातील प्रत्येक घरावर तिरंगा फडकवण्याचे आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. तर शहर स्वच्छ ठेवण्याबरोबरच पर्यावरण वृध्दीसाठी शहरात झाडे लावण्याचा सामुहिक संकल्पही करण्यात आला.

### स्वच्छतेची सामुहिक शपथ

आम्ही भारताचे सुजाण नागरिक शपथ घेतो की, आम्ही या भारत मातेला, या वसुंधरेला स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्रयत्न करू, या वसुंधरेला या पर्यावरणाला आमच्यापासून कोणतीही हानी होणार नाही याची दक्षता घेऊ. आम्ही या देशाला सुजलाम-सुफलाम करण्यासाठी कटीबध्द राहू व आमच्याकडून पर्यावरणाला त्रास होईल, असे कोणतेही काम आम्ही करणार नाही, जास्तीत जास्त झाडे लावून या देशाला या वसुंधरेला स्वच्छ, सुंदर, हरित आणि प्रदुषणमुक्त करण्यासाठी आम्ही प्रयत्न करू, अशी शपथ यावेळी उपस्थितांनी घेतली. शपथेचे वाचन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

# पुण्यात पोलीस उपनिरीक्षकाकडून मेडिकल चालकाला शिवीगाळ अन् जीवे मारण्याची धमकी

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात काही पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना वर्दी च्या दादागिरी चे भूत डोक्यावर बसलं की काय असा प्रश्न उपस्थितीत होताना दिसतोय. २ दिवसांपूर्वी पुणे शहरातील वाहतूक विभागाच्या कर्मचाऱ्याचा कॅब चालकाला मारहाण करताना व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर आता शहरातील आणखी एक प्रकार समोर आला आहे. पुणे पोलिस दलात कार्यरत असलेल्या एका पोलिस उपनिरीक्षकाने थेट मेडिकल चालकाला शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. तर संबंधित पोलिस उपनिरीक्षकासोबत असलेल्या मित्राने मेडिकल चालकाच्या विरोधात तक्रार दिली आहे.

याप्रकरणी विश्रामबाग पोलिस ठाण्यात दोन्ही बाजूकडून एकमेकांच्या विरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही सर्व घटना पुण्यातील नारायण पेठेत १३ ऑगस्ट रोजी घडली. तसेच ही सर्व घटना सीसीटिव्हीमध्ये कैद झाली आहे. विजय सरवार असे या अधिकाऱ्याचे नाव असून ते चंदननगर पोलीस स्टेशन येथे परिविक्षाधीन (प्रोबेशनल) पोलीस उपनिरीक्षक म्हणून नेमणुकीस आहेत.विश्रामबाग पोलिस ठाण्यात याबाबत मेडिकल चालक महादेव चौरे यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ५ वाजण्याचा सुमारास नारायणन पेठेतील मातोश्री मेडिकल येथे फिर्यादी महादेव चौरे हे मेडिकलमध्ये झाडू मारत होते. यावेळी त्यांच्या दुकानासमोर पोलिस उपनिरीक्षक विजय सरवार जर त्यांच्या मित्रांसोबत थांबले होते. दुकानासमोर उभा राहिलेल्या या लोकांना मेडिकल चालकाने बाजूला होण्यास त्यांनी सांगितले. यातून त्यांच्यात वाद झाला. दरम्यान, पोलिस उपनिरीक्षक विजय सरवार आणि त्यांच्यासोबत असलेल्या हनुमंत रायकर यांनी फिर्यादु यांना मारहाण करत शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. ही सर्व घटना सीसीटिव्ही मध्ये कैद झाली. त्याबाबत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे अदखल पात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या बाजूला, याच प्रकरणात सुमित रायकर यांनी देखील महादेव चौरे यांनी शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली अशी तक्रार दिल्यावरून मेडिकल चालक यांच्यावर अदखलपात्र गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# सहाय्यक पोलीस फौजदार संजय शिरसाट यांना पोलीस पदक

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील आर्थिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस फौजदार संजय दामोदर शिरसाट यांना सन २०२५ च्या स्वातंत्र्यदिनानिमित्त (दि. १५ ऑगस्ट २०२५) गुणवत्तापूर्ण सेवेसाठी प्रतिष्ठेचे पोलीस पदक जाहीर झाले आहे.




संजय शिरसाट यांनी १९९३ मध्ये पुणे शहर पोलीस दलात पोलीस शिपाई म्हणून प्रवेश केला. त्यानंतर विविध पोलीस ठाणे आणि शाखांमध्ये त्यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली. वाहतूक शाखेत कार्यरत असताना वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली व्ही.व्ही.आय.पी. आणि व्ही.आय.पी. बंदोबस्ताची आखणी आणि अंमलबजावणी यशस्वीपणे केली. गुन्हे शाखेत असताना त्यांनी अनेक गुन्ह्यांच्या तपासात मोलाचे योगदान देत गुन्हे उघडकीस आणले. सध्या आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत असताना बंडगार्डन, भारती विद्यापीठ, हडपसर आणि विश्रामबाग पोलीस ठाण्यांतील गंभीर गुन्ह्यांचा तपास करून आरोपींना अटक आणि वेळेत दोषारोपपत्र सादर करण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी केले आहे. शिरसाट यांना त्यांच्या प्रदीर्घ सेवाकाळात एकूण २९१ बक्षिसे मिळाली असून, यापूर्वी १ मे २०१७ रोजी त्यांना पोलीस महासंचालक पदकाने सन्मानित करण्यात आले होते. त्यांच्या या सातत्यपूर्ण आणि उल्लेखनीय सेवेबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# पुणेकरांना मेट्रोकडून मोठा दिलासा! स्वातंत्रदिनापासून मेट्रोच्या फेऱ्या वाढणार



**पुणे । प्रतिनिधी**

**पुण्यात वाहतूक कोंडी ही नित्याचीच बाब बनली आहे. दररोज पुणेकरांना वाहतूक कोंडीतून वाट काढत जावं लागतं. यामुळे कोंडीचे लागलेलं ग्रहण दूर करण्यासाठी पुणे मेट्रोने मोठा निर्णय घेतला आहे. आता गर्दीची वेळी दर ६ मिनिटांनी मेट्रो धावणार आहे. ही खरंतर पुणेकरांसाठी दिलासा देणारी बातमी आहे. तर ज्यावेळी गर्दी नसेल त्यावेळी मात्र, नेहमीप्रमाणे दर १० मिनिटांनी एक ट्रेन धावणार असल्याची माहिती पुणे मेट्रोच्या वतीने देण्यात आली आहे.**

स्वातंत्रदिनी म्हणजेच १५ ऑगस्टपासून हा निर्णय लागू होणार आहे. त्यानुसार दररोज सकाळी ९ ते ११ आणि सायंकाळी ४ ते ८ या वेळेत दर सात मिनिटांनी एक ट्रेन अशी सेवा प्रवाशांना दिली जाते. मात्र, आता १५ ऑगस्पासून पुणे मेट्रो गर्दीच्या वेळेस दर सहा मिनिटांनी एक ट्रेन अशी सेवा प्रवाशांना दिली जाणार आहे. हा निर्णय प्रशासनाने घेतला असल्याची माहिती महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी दिली आहे.

पुणे मेट्रोच्या दोन्ही मार्गिका मिळून ४९० फेऱ्या मेट्रोची सेवा पुरवण्यात येते. आता नवीन निर्णय लागू झाल्यानंतर यामध्ये मोठा बदल होणार असून, दर ६ मिनिटाला ट्रेन यामुळे अधिक ६४ फेऱ्या वाढणार आहेत. त्यानुसार १५ ऑगस्टपासून एकूण फेऱ्या ५५४ वाढणार आहे. ६ मिनिटांचा कालावधी आणण्यासाठी त्यासाठीच्या संबंधित तांत्रिक चाचण्या मेट्रोकडून पूर्ण करण्यात आल्या आहेत.

प्रवासी संख्या वाढली

खरंतर ज्यावेळी पुण्यात मेट्रो सेवेला सुरुवात करण्यात आली. सुरुवातीला मेट्रोला पुणेकरांना पाठ फिरवल्याचे चित्र होते. मात्र, त्यानंतर पुणेकर मेट्रोने प्रवास करत असून, मेट्रो सेवेला उंदड प्रतिसाद देत आहेत. जुलै महिन्यात दैनंदिन प्रवासी संख्या १,९२,००० पर्यंत वाढली आहे.

# तानाजी सावंताच्या मुलाच्या अपहरण नाट्याचा शेवट; पोलिसांकडून 'बी फायनल' अहवाल सादर!

पुणे । प्रतिनिधी

शिवसेना आमदार तानाजी सावंत यांच्या मुलाच्या अपहरण प्रकरणाने राज्यात खळबळ उडवली होती. मात्र, आता या प्रकरणाला पूर्णविराम मिळाला असून, पोलिसांनी यासंबंधीचा तपास पूर्ण करत कोर्टात 'बी फायनल' अहवाल सादर केला आहे. या अहवालात अपहरणाचा कोणताही पुरावा नसल्याचे स्पष्ट झाले असून, प्रकरणाची फाइल बंद करण्यात आली आहे.

१० फेब्रुवारी २०२५ रोजी माजी मंत्री आणि शिवसेना आमदार तानाजी सावंत यांनी सिंहगड रोड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती की, त्यांचा ३२ वर्षीय मुलगा ऋषिराज सावंत याचे अपहरण झाले आहे. एका अनामिक फोन कॉलनंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत अपहरणाचा गुन्हा नोंदवला. तपासादरम्यान असे समोर आले की, ऋषिराज यांनी आपल्या दोन मित्रांसह (प्रवीण उपाध्याय आणि संदीप



वासेकर) खासगी चार्टर्ड विमानाने बँकॉकला जाण्याचा प्लॅन आखला होता. विशेष म्हणजे, त्यांनी ही बाब कुटुंबाला कळवली नव्हती.

पुणे पोलिसांनी विमान वाहतूक मंत्रालय आणि नागरी उड्डाण संचालनालय यांच्याशी समन्वय साधत अंदमान-निकोबार बेटांजवळून (पोर्ट ब्लेअर) बँकॉकला जाणारे चार्टर्ड विमान परत पुणे विमानतळावर बोलावले. विमान परतल्यानंतर ऋषिराज आणि त्यांच्या मित्रांना केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाने ताब्यात घेतले. तपासात स्पष्ट झाले की, ऋषिराज हे खासगी कामानिमित्त बँकॉकला जात होते आणि कोणतेही अपहरण झाले नव्हते.ऋषिराज यांनी घरी कोणालाही न कळवता बँकॉकला जाण्याचा निर्णय घेतला होता, ज्यामुळे त्यांचे वडील तानाजी सावंत यांना अपहरणाचा संशय आला. तानाजी सावंत यांनी स्वतः पुणे पोलिस आयुक्त कार्यालयात हजर राहून कारवाईसाठी पाठपुरावा केला. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याशी संपर्क साधला होता. यामुळे पोलिसांनी तातडीने कारवाई करत विमान परत बोलावले. मात्र, नंतर हे प्रकरण गैरसमजातून उद्भवल्याचे स्पष्ट झाले.

ऋषिराज यांचे मोठे बंधू गिरीराज सावंत यांनी सांगितले की, ऋषिराज यांनी दुपारी ३:३० वाजता आपण दोन दिवसांच्या प्रवासाला जात असल्याचा मेसेज पाठवला होता. मात्र, त्यांनी फोन बंद केल्याने कुटुंबाला चिंता वाटली. गिरीराज यांनी याला कौटुंबिक गैरसमज ठरवत, वडिलांच्या कारवाईचे समर्थन केले.

### 'बी फायनल' अहवालाने प्रकरणाला पूर्णविराम

पाच महिन्यांच्या तपासानंतर पुणे पोलिसांनी या प्रकरणात कोणतेही अपहरण झाले नसल्याचे स्पष्ट केले आहे. संयुक्त पोलिस आयुक्त रंजन कुमार शर्मा यांनी सांगितले की, ऋषिराज यांनी स्वतःच्या इच्छेने बँकॉकला जाण्याचा निर्णय घेतला होता आणि यामागे कोणताही गुन्हा नव्हता. यामुळे पोलिसांनी कोर्टात 'बी फायनल' अहवाल सादर करत हे प्रकरण बंद केले आहे. 'बी फायनल' अहवालाचा अर्थ असा की, तपासात गुन्हा सिद्ध झाला नाही आणि पुढील कारवाईची आवश्यकता नाही.

# पुणे महानगरपालिका अग्निशामक दलाच्या तिघांना स्वातंत्र्य दिनानिमित्त गुणोत्कृष्ट अग्निशमन सेवा पदक

पुणे । प्रतिनिधी

पुणे महानगरपालिकेच्या अग्निशामक दलातील सेवानिवृत्त स्टेशन ड्युटी ऑफिसर सुभाष प्रभाकर जाधव, सेवानिवृत्त फायर इंजिन ड्रायव्हर रामचंद्र तुकाराम गोसावी आणि फायरमन छगन ताराचंद मोरे यांना स्वातंत्र्य दिनानिमित्त (१५ ऑगस्ट २०२५) देशाचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून गुणोत्कृष्ट अग्निशमन सेवा पदक जाहीर झाले आहे. या मानाच्या पुरस्काराने पुणे अग्निशामक दलाचा गौरव वाढला आहे.

सुभाष जाधव १९९१ मध्ये फायरमन म्हणून पुणे महानगरपालिका अग्निशामक दलात दाखल झाले आणि एप्रिल २०२५ मध्ये स्टेशन ड्युटी ऑफिसर म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यांना यापूर्वी २००४ मध्ये राष्ट्रपती शौर्य पदक मिळाले आहे. त्यांनी ३४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेत अनेक धाडसी कामगिरी केल्या. विशेषत: २०२१ मध्ये सिरम इन्स्टिट्यूट मांजरी, फॅशन स्ट्रीट, पुणे कॅम्प आणि २०२३ मध्ये वडगाव शेरी येथील मल्टिप्लेक्स थिएटर, भवानी पेठ टिंबर मार्केट आणि काकडे वस्ती, बिबवेवाडी येथील आगीच्या घटनांमध्ये त्यांनी आपल्या अनुभवाच्या जोरावर जिवित आणि वित्तहानी टाळण्यात मोलाची भूमिका बजावली. त्यांच्या या कामगिरीबद्दल महानगरपालिकेने त्यांना वेळोवेळी रोख पारितोषिकाने गौरवले आहे.

रामचंद्र गोसावी १९९१ मध्ये फायर इंजिन



ड्रायव्हर म्हणून दलात रुजू झाले आणि एप्रिल २०२५ मध्ये त्याच पदावरून सेवानिवृत्त झाले. त्यांनी २०१८ मध्ये पाटील इस्टेट झोपडपट्टी, वाकडेवाडी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, मार्केट यार्ड, २०१९ मध्ये शनिवार पेठ, २०२२ मध्ये सोपान नगर, वडगाव शेरी आणि २०२३ मध्ये भवानी पेठ टिंबर मार्केट येथील आगीच्या घटनांमध्ये आपल्या कौशल्याने मोठ्या प्रमाणात वित्तहानी टाळली. त्यांच्या या धाडसी कामगिरीसाठी त्यांना महानगरपालिकेने अनेकदा रोख पारितोषिक देऊन सन्मानित केले आहे.

छगन मोरे १९९५ मध्ये फायरमन म्हणून दलात दाखल झाले आणि सध्या ते अग्निशमन मुख्यालयात कार्यरत आहेत. त्यांनी २०१३ मध्ये कोथरूड येथील त्रिमूर्ती हाईटस येथील भीषण आगीत नागरिकांची सुटका, २०१४ मध्ये विश्रांतवाडी, आरटीओ ऑफिस जवळील आग, २०२३ मध्ये भवानी पेठ टिंबर मार्केट येथील आगीच्या घटनांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. याशिवाय, २०१६ मध्ये मांडवगण फराटा, श्रीगोंदा येथे कुपनलिकेत पडलेल्या ५ वर्षीय मुलाला ३६ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर सुखरूप बाहेर काढले. तसेच, २०२३ मध्ये कोल्हापूर येथील पूरपरिस्थितीत त्यांनी विशेष कामगिरी बजावली. या सर्व कामगिरीसाठी त्यांना महानगरपालिकेने रोख पारितोषिकाने गौरवले आहे.

पुणे अग्निशामक दलाचे मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांनी या पुरस्कार प्राप्तकर्त्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, आमचे जवान कायम कर्तव्याशी एकनिष्ठ राहिले आहेत. या पुरस्कारामुळे दलाचा गौरव वाढला आहे. त्यांनी पदक विजेत्यांचे कौतुक करत समाधान व्यक्त केले. हा पुरस्कार पुणे महानगरपालिका अग्निशामक दलाच्या समर्पित सेवेचा आणि त्यांच्या धाडसी कामगिरीचा सन्मान आहे.

# दानवे आणि सावंत यांच्या हस्ते रविवारी उद्धव श्री पुरस्कार वितरण सोहळा

**पिंपरी, पुणे । प्रतिनिधी**

**शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त देण्यात येणाऱ्या उद्धव श्री २०२५ पुरस्काराची नुकतीच घोषणा करण्यात आली आहे. हा पुरस्कार वितरण समारंभ आणि राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेचे धनादेश वाटप विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि केंद्रीय मंत्री शिवसेना नेते अरविंद सावंत यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.**

यावर्षीचा उद्धव श्री २०२५ पुरस्कार उद्योजक विश्व चोरडिया तसेच शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणारे राजेश म्हस्के यांना जाहीर झाला आहे अशी माहिती पुरस्कार समितीचे अध्यक्ष व संयोजक माजी आमदार, शिवसेना जिल्हाप्रमुख ड. गौतम चाबुकस्वार आणि संयोजक सचिव माधव मुळे यांनी प्रसिद्धीस दिली आहे. रविवारी (दि.१७ ऑगस्ट) सायंकाळी पाच वाजता पिंपरी येथील आचार्य अत्रे रंगमंदिर येथे हा समारंभ होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून उपनेते रवींद्र मिर्लेकर, संपर्कप्रमुख आमदार सचिन आहिर, सह संपर्कप्रमुख पुणे जिल्हा आदित्य शिरोडकर, संपर्क प्रमुख भोसरी, पिंपरी विधानसभा केशरीनाथ पाटील, शिवसेना शहरप्रमुख







संजोग वाघेरे पाटील, शहर संघटिका रुपाली आल्हाट आणि ड. असीम सरोदे आदी उपस्थित राहणार आहेत.

उद्धव श्री२०२५ पुरस्कारासाठी संजय आवटे (पत्रकारिता), विजय जगताप (सहारा वृद्धाश्रम), अनिल भांगडिया (उद्योजक), साजन बेंद्रे (कलाक्षेत्र), शशिकांत उर्फ बबन झिंजुर्डे (कामगार क्षेत्र), विशाल गायकवाड (कला क्षेत्र) देवा झिंजाड (लेखक), स्वातीताई गवारे (महिला उद्योजिका) अभिमन्यू सूर्यवंशी (क्रीडाक्षेत्र) यांचीही निवड करण्यात आली आहे. अशी माहिती उद्धवश्री पुरस्कार समितीचे कार्याधक्ष युवराज कोकाटे, संघटक हाजी दस्तगीर मणियार, उपाध्यक्ष सुशीला पवार, संघटिका वैभवी घोडके, उपाध्यक्ष गोपाळ मोरे, सहसचिव नेताजी काशीद, खजिनदार हरेश नखाते, सह संघटक निखिल दळवी, सदस्य अभिजीत गोफण, प्रशांत तायडे, गुलाबचंद आसवानी, अशोक वाळके, कैलास नेवासकर, सावल तोतानी, संतोष म्हात्रे यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

तसेच माजी नगरसेवक रवी लांडगे, जिल्हा संघटिका अनिताताई तुतारे,

युवासेना अधिकारी चेतन पवार, छावा संघटना संस्थापक बाबासाहेब भोसले, उपजिल्हाप्रमुख रोमी संधू, माजी शहरप्रमुख सचिन भोसले, मावळ तालुकाप्रमुख आशिष ठोंबरे, पिंपरी विधानसभा प्रमुख तुषार नवले, जिल्हा उपसंघटिका वैशाली मराठे, जिल्हा संघटिका शैला खंडागळे, भोसरी विधानसभा प्रमुख धनंजय आल्हाट, तळेगाव शहर प्रमुख शंकर भेगडे, युवा सेना पुणे जिल्हाधिकारी अनिकेत घुले, सह संपर्क संघटिका शाधनभाभी चौधरी, उपजिल्हा संघटिका कल्पना शेटे, उपजिल्हाप्रमुख सुरेश गायकवाड, उद्योजक मुकेश फाले, शहर प्रमुख लोणावळा बाळासाहेब फाटक, माजी उपजिल्हाप्रमुख भारत ठाकूर, माजी नगरसेविका मीनल यादव आणि रेखाताई दर्शले, तालुका उप प्रमुख एकनाथ जांभुळकर, देहूरोड शहर प्रमुख संदीप बालघरे तसेच प्रणिल पालेकर, तालुका संघटक शांताराम भोते, विधानसभा समन्वयक सुषमाताई शेलार, तालुका उपप्रमुख युवराज सुतार, तालुका समन्वयक रवींद्र गायकवाड, वडगाव शहर प्रमुख राहुल नखाते, तालुका सल्लागार मारुती खोले, तालुका माजी प्रमुख रमेश हगवणे, तालुका सल्लागार रमेश जाधव, तळेगाव शहर संघटक सतीश गरुड, देहू गाव शहर प्रमुख राजेश मोरे, विधानसभा संघटिका वैशाली कुलथे, वैशाली काटकर, गौरी घंटे, मंगलाताई भोकरे, उपशहर संघटिका योगिनीताई मोहन, स्मिताताई जगदाळे, रंजनीताई वाघ, ज्योतीताई भालके, कामनीताई मिश्रा आदींसह शिवसेनेचे आजी माजी नगरसेवक उप शहर प्रमुख, विभाग प्रमुख, शहर संघटक, विधानसभा अधिकारी, उपविभाग प्रमुख, शहर समन्वयक, शिव आरोग्य सेनेचे पदाधिकारी, युवा सेनेचे पदाधिकारी, विधानसभा संघटिका, उपशहर संघटिका, उपविभाग संघटिका, शिव सेनेचे सर्व विभाग प्रमुख, शाखाप्रमुख, अंगीकृत संघटना आजी माजी पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# पहिल्यांदाच 'पहाडी तस्कर' सापाचा शोध; सर्पमित्र खेडकर यांचे कौतुक

भोर । प्रतिनिधी

वेल्हा तालुक्याच्या घाटमाथा परिसरात सहज आढळणारा परंतु नसरापूरमध्ये आजवर कधीही न दिसलेला 'पहाडी तस्कर' साप पहिल्यांदाच येथे आढळून आला आहे. पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्व रक्षक असोसिएशनचे कार्यकर्ते आणि अनुभवी सर्पमित्र श्रीकांत उर्फ सोन्या खेडकर यांना हा साप केळवडे येथील हॉटेल कृष्णाई परिसरात दिसून आला.

माहितीनुसार, खेडकर यांनी नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तत्परतेने या सापाला सुरक्षितरीत्या पकडले. पुणे जिल्हा वन्य प्राणी सर्प रक्षक असोसिएशनचे अध्यक्ष सुशील विभुते यांच्या माहितीनुसार, त्यानंतर सापाला त्याच्या नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले.'पहाडी तस्कर' हा बिनविषारी, परंतु दुर्मीळ साप असून पश्चिम घाटातील डोंगराळ आणि दाट जंगलात तो आढळतो. याचे अंग हलक्या तपकिरी रंगाचे असून त्यावर काळे-पांढरे पट्टे असतात. नसरापूरसारख्या डोंगर पायथ्याच्या भागात त्याची उपस्थिती ही पहिल्यांदाच नोंदवली गेली असून यामुळे स्थानिक जैवविविधतेला नवा भर पडल्याचे मानले जात आहे.श्रीकांत उर्फ सोन्या खेडकर हे अनेक वर्षांपासून वन्यजीव संरक्षण आणि साप बचाव मोहिमेत कार्यरत आहेत. आतापर्यंत त्यांनी असंख्य साप, पक्षी आणि इतर वन्यजीव सुरक्षितपणे वाचवून नैसर्गिक अधिवासात सोडले आहेत. त्यांच्या या तत्परतेमुळे नागरिकांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे. स्थानिक पर्यावरणप्रेमींनी याला एक महत्त्वपूर्ण घटना मानत, नसरापूर परिसरात दुर्मीळ प्रजातींचा शोध आणि त्यांचे संरक्षण हे जैवविविधतेसाठी मोठे पाऊल आहे, असे मत व्यक्त केले.